RNI No.: MAHBIL/2016/68485
www.acrossstates.com
पोस्टाचा परवाना क्र. MNW/335/2018-20

शालेय शिक्षण मंत्री दीपक केसरकर यांच्यासमवेत चर्चेनंतर कनिष्ठ महाविद्यालय शिक्षक संघाचा उत्तरपत्रिका तपासणीवरील बहिष्कार मागे
पान २ पाहा

# मराठी अक्रॉस मुंबई

संपादक- संजय मंगेश भैरे
वर्षः ९ अंक : १४ मुंबई, मंगळवार २७ फेब्रु. ते ०४ मार्च '२४
मूल्य - ५.०० रुपये पाने - ८

मुंबई येथील अन्न चाचणी प्रयोगशाळेचे प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या हस्ते दूरदुष्य प्रणालीद्वारे उद्घाटन
पान ३ पाहा

## सर्वांच्या आयुष्यात सुख-समाधान अन् आनंदाचे दिवस येत राहोत ! – मुख्यमंत्री एकनाथ शिंदे

**ठाणे**

श्री श्रीनिवास महोत्सवाच्यानिमित्ताने सर्वांच्या आयुष्यात सुख-समाधान अन् आनंदाचे दिवस येत राहोत, अशी सदिच्छा मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी आज डोंबिवली येथे व्यक्त केली. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे हे तिरुपती देवस्थान, श्रीनिवास महोत्सवासाठी प्रीमिअर मैदान,डोंबिवली (पूर्व) येथे उपस्थित होते, त्यावेळी ते बोलत होते.



यावेळी त्यांच्या पत्नी सौ. लता एकनाथ शिंदे, विधानपरिषदेच्या उपसभापती डॉ. नीलम गोऱ्हे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, ग्रामविकास मंत्री गिरीश महाजन, सार्वजनिक बांधकाम मंत्री (सार्वजनिक उपक्रम) दादा भुसे , कौशल्य विकास मंत्री मंगल प्रभात लोढा, सार्वजनिक बांधकाम मंत्री (सार्वजनिक उपक्रम वगळून) रवींद्र चव्हाण, खासदार डॉ. श्रीकांत शिंदे, आमदार डॉ.बालाजी किणीकर, माजी आमदार रवींद्र फाटक, माजी महापौर नरेश म्हस्के यांच्यासह विविध मान्यवरांची उपस्थिती होती.

मुख्यमंत्री एकनाथ शिंदे पुढे म्हणाले की, आज येथे आयोजित केलेल्या श्री श्रीनिवास महोत्सवाच्या माध्यमातून हा परिसर पावन,पवित्र, मंगलमय झाला आहे. तिरुपती बालाजी सर्वांच्या आयुष्यात सुख-समृद्धी-समाधान- आनंद आणतात. मनुष्याचे संपूर्ण जीवन बदलून टाकतात, त्याला दुःखातून सुखात आणतात.

आपल्या सर्वांच्या आयुष्यातील दुःख निघून जावो,या सदिच्छा व्यक्त करून ते पुढे म्हणाले की, मागील वर्षी जून महिन्यामध्ये नवी मुंबई येथे तिरुपती बालाजी मंदिराचा भूमीपूजन सोहळा संपन्न झाला. लवकरच मंदिराचे काम पूर्ण होईल आणि नवी मुंबईतच आपल्या सर्वांना तिरुपती बालाजीचे दर्शन घेता येईल. आज या महोत्सवाच्या माध्यमातून हजारो लोकांना साक्षात तिरुपती बालाजीचे दर्शन झाले. त्यांना येथील पूजेत सहभागी होता आले, प्रसादाचा लाभ घेता आला.

या पवित्र कार्यक्रमाचे आयोजन केल्याबद्दल खासदार डॉ.श्रीकांत शिंदे आणि त्यांच्या सर्व सहकाऱ्यांचे मनःपूर्वक अभिनंदन करून श्री.शिंदे म्हणाले की, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या प्रयत्नांनी अयोध्या येथे राम मंदिर निर्माण झाले. त्यांच्या हस्ते अबूधाबीतही मंदिराचे लोकार्पण झाले. देशातील राममय वातावरणामुळे सर्वत्र आनंदाचे आणि उत्साहाचे वातावरण आहे.

याप्रसंगी उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस उपस्थितांना शुभेच्छा देताना म्हणाले की, श्री श्रीनिवास कल्याण महोत्सवाच्या माध्यमातून साक्षात भगवान तिरुपती बालाजीचे दर्शन झाले व प्रसादाचाही लाभ घेता आला. यासाठी खासदार डॉ. श्रीकांत शिंदे व त्यांच्या सर्व सहकाऱ्यांचे विशेष धन्यवाद. तिरुपती बालाजी त्यांच्या प्रत्येक भक्ताची इच्छा पूर्ण करतात हा सर्वानुभव आहे, त्यामुळे हा महोत्सव आपल्या सर्वांच्या मनोकामना पूर्ण करणारा ठरो, या सदिच्छा. या महोत्सवासाठी तिरूपती बालाजी देवस्थानाचे पदाधिकारी, विविध मान्यवरांसह हजारो नागरिकांची उपस्थिती होती.

## सरकार अ‍ॅक्शन मोडमध्ये , मनोज जरांगेंवर गुन्हा दाखल

**मुंबई**

मनोज जरांगे यांनी उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यावर एकेरी आणि खालच्या भाषेत टीका केल्यानंतर आतापर्यंत सबुरीचे धोरण बाळगत असलेले राज्य सरकार अ‍ॅक्शन मोडमध्ये आले आहे. यापूर्वी पोलिसांकडून मराठा आंदोलकांवर गुन्हे दाखल करण्यात आले होते. परंतु, सोमवारी पहिल्यांदाच पोलिसांकडून थेट मनोज जरांगे यांच्यावर गुन्हा दाखल करण्यात आला.



कालपासून राज्य सरकारकडून जवळपास १०४१ गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. यापैकी ४२५ गुन्हे मराठवाड्यात दाखल करण्यात आले आहेत. तर बीड जिल्ह्यातील शिरुर आणि अमळनेरमध्ये मनोज जरांगे यांच्यावर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. रास्ता रोकोसाठी लोकांना प्रवृत्त केल्याप्रकरणी पोलिसांनी जरांगे यांच्यावर गुन्हा दाखल केल्याचे समजते.

### भाजप आमदारांच्या बैठकीत महत्त्वाचा निर्णय

मराठा आरक्षणाच्या मुद्द्यावरुन राज्यातील वातावरण पुन्हा एकदा तापण्याची शक्यता आहे. या पार्श्वभूमीवर सोमवारी मुंबईत भाजप आमदारांची बैठक पार पडली. यावेळी भाजप आमदारांना महत्त्वाच्या सूचना देण्यात आल्या. आपण मराठा समाजाच्या पाठिशी आहोत, ही बाब आपापल्या मतदारसंघात जाऊन सामान्य नागरिकांपर्यंत पोहोचवा. मनोज जरांगे पाटील वैयक्तिक स्वार्थासाठी राजकीय भाषा बोलत आहेत. मराठा आरक्षणाचा मुद्दा संयमाने हाताळला पाहिजे. भाजप मराठा समाजाच्या पाठिशी राहणार आहे. यापूर्वीही भाजप सरकारनेच मराठा समाजाला दिलेले आरक्षण उच्च न्यायालयात टिकवले. आतादेखील नव्याने दिलेले आरक्षण कोर्टात टिकेल, हा विश्वास लोकांना द्या, अशी सूचना भाजप आमदारांना करण्यात आली आहे. तसेच या बैठकीत भाजप आमदारांनी मनोज जरांगे यांच्या वक्तव्याविषयी नाराजी व्यक्त केली. मनोज जरांगे राजकीय भाषा बोलत असतील तर त्यांना प्रत्युत्तर द्या, असेही भाजप आमदारांना सांगण्यात आले आहे.

### मनोज जरांगे यांचे उपोषण स्थगित

मनोज जरांगे पाटील यांनी सोमवारी दुपारी आमरण उपोषण स्थगित करत असल्याची घोषणा केली. त्याचे रुपांतर साखळी उपोषणात करणार असल्याचे त्यांनी सांगितले. मनोज जरांगे आता पुढील एक-दोन दिवस उपचार घेऊन मराठा बांधवांच्या भेटीसाठी गावागावात फिरणार आहेत. यावेळी मनोज जरांगे यांच्या दौऱ्यांना मराठा बांधवांचा पूर्वीप्रमाणेच प्रतिसाद मिळणार का, हे आता पाहावे लागेल. राज्य सरकारकडून मराठा आंदोलन चिघळू नये, यादृष्टीने खबरदारीची पावले उचलली आहेत. त्यासाठी मराठवाड्यातील तीन जिल्ह्यांमध्ये इंटरनेट सेवा खंडित करण्यात आली आहे.

## पारदर्शक सोडतीमुळे 'म्हाडा'वर सर्वसामान्यांचा विश्वास : मुख्यमंत्री

**प्रतिनिधी**
**मुंबई**

म्हाडाच्या पारदर्शक संगणकीय सोडत प्रणालीने सर्वसामान्यांचा विश्वास संपादन केला आहे हे म्हाडाच्या घरांच्या सोडतीला नागरिकांकडून मिळणाऱ्या उस्फुर्त प्रतिसादावरून आपल्याला दिसून येते. सात दशकांत नऊ लाख घरांची निर्मिती करणारे प्राधिकरण सर्वसामान्यांच्या गृहस्वप्न पूर्तीचे खऱ्या अर्थाने आधारवड ठरले आहे, असे प्रतिपादन राज्याचे मुख्यमंत्री श्री एकनाथ शिंदे यांनी आज म्हाडाचा विभागीय घटक कोंकण मंडळाच्या ५३११ सदनिकांच्या वितरणाकरिता आयोजित संगणकीय सोडत कार्यक्रमामध्ये केले.





म्हाडाचा विभागीय घटक कोंकण गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळाच्या अखत्यारीतील ५३११ सदनिकांच्या वितरणाकरिता राम गणेश गडकरी रंगायतन नाट्यगृह, ठाणे येथील आयोजित संगणकीय सोडत कार्यक्रमात श्री शिंदे बोलत होते. यावेळी गृहनिर्माण मंत्री अतुल सावे, विधानपरिषद आमदार निरंजन डावखरे, आमदार संजय केळकर,माजी आमदार रवींद्र फाटक, ठाणे जिल्हाधिकारी अशोक शिनगारे, म्हाडाचे उपाध्यक्ष तथा मुख्य कार्यकारी अधिकारी संजीव जयस्वाल, कोंकण गृहनिर्माण व क्षेत्र विकास मंडळाचे मुख्य कार्यकारी अधिकारी मारोती मोरे आदि मान्यवर उपस्थित होते.

अन्न, वस्त्र निवारा या मानवाच्या मूलभूत गरजा आहेत आणि यापैकी निवाऱ्याचा गरजेची पूर्तता ही काळाची आणि समाजाची गरज आहे. राज्यातील नागरिकांना हक्काचा निवारा मिळवून देऊन त्यांच्या जीवनमानाचा दर्जा उंचावण्यास राज्य शासनासह केंद्र शासन देखील सर्वतोपरी प्रयत्नशील आहे असे श्री शिंदे यांनी सांगितले व ते पुढे म्हणाले की नुकटाच झालेला सोलापूर येथील असंघटित कामगारांसाठी उभारण्यात आलेल्या देशातील सर्वात मोठ्या रे नगर येथील गृहप्रकल्पाचा चावी वाटप कार्यक्रम म्हणजेच शासनाच्या सामाजिक बांधिलकीचे सर्वोत्तम उदाहरण ठरते. त्याचबरोबर गिरणी कामगार व त्यांच्या वारसांना हक्काचा निवारा उपलब्ध करून देणारे देशातील महाराष्ट्र हे एकमेव राज्य ठरते. समाजातील शेवटच्या घटकाला हक्काचा निवारा मिळावा याकरिता शासन वेळोवेळी नवीन नियम संमत करून म्हाडाचे हाथ अधिक बळकट करीत आहे, असेही ते म्हणाले

ते पुढे म्हणाले की, आपल्या देशाची अर्थव्यवस्था प्रगतीपथावर असून आता अर्थव्यवस्थेमध्ये आपला भारत देश जगात तिसऱ्या क्रमांकावर आहे. देशात आणि राज्यात सर्वांगीण विकास होताना दिसतोय. शासनाकडून देण्यात येणारी ही सर्व घरे वेळेमध्ये पूर्ण झाली पाहिजेत. जे वेळेत घर पूर्ण करतील त्यांना सन्मानित करण्यात येईल तर जे काम वेळेत काम करणार नाहीत त्यांना निश्चितच दंड आकारण्यात येईल. शेवटी म्हाडा सदनिका सोडत 2023-24 मध्ये ज्यांना घरे मिळाली आहेत त्या सर्वांचे मुख्यमंत्र्यांनी अभिनंदन केले.

या प्रसंगी बोलताना गृहनिर्माण मंत्री श्री सावे यांनी उपस्थित अर्जदारांना सोडतीच्या शुभेच्छा दिल्या व सांगितले कि ज्या अर्जदारांना सोडतीत घरे लागणार नाही त्यांनी निराश होऊ नये. म्हाडामार्फत राबविण्यात येणाऱ्या पुनर्विकास प्रकल्पांच्या माध्यमातून अधिकाधिक गृहनिर्मिती होणार आहे ज्यामुळे घरांची मागणी व पुरवठा तफावत कमी होण्यास निश्चितच मदत होईल असा विश्वास याप्रसंगी व्यक्त केला.

कार्यक्रमाची सुरुवात राज्यगीताने व दीपप्रज्वलनाने झाली. कार्यक्रमाचे प्रास्ताविक म्हाडाचे उपाध्यक्ष तथा मुख्य कार्यकारी अधिकारी श्री संजीव जयस्वाल यांनी केले व मंडळाचे मुख्य अधिकारी श्री मारोती मोरे यांनी आभार प्रदर्शन केले. यावेळी म्हाडाचे अधिकारी-कर्मचारी, सोडतीमध्ये भाग घेतलेले नागरिक मोठया संख्येने उपस्थित होते.

## गायक पंकज उधास यांचं निधन



**मुंबई**

आपल्या जादुई आवाजाने रसिकांच्या मनावर मोहिनी घालणाऱ्या आणि विविध गझल गाणाऱ्या गायक पंकज उधास यांचं निधन झालं आहे.पंकज उधास ७२ वर्षांचे होते. त्यांच्या निधनाची माहिती त्यांच्या कुटुंबीयांनी दिली आहे. गाणी, गझल या प्रांतात स्वच्छंदपणे वावरणारा एक कलाकार काळाच्या पडद्याआड गेला आहे. 'चिठ्ठी आयी है..' ही त्यांची गझल अजरामर होती, आहे आणि राहिल यात काही शंकाच नाही. 'चांदी जैसा रंग हो तेरा सोने जैसे बाल..' ही गझल ऐकून तर एक पिढी मोठी झाली आहे. या प्रकारचं प्रेम व्यक्त करणारी गझल असो किंवा 'चिठ्ठी आयी है..' सारखी विराणी असो त्यासाठी पंकज उधास हे कायमच स्मरणात राहतील.

पंकज उधास यांच्या जाण्याने संगीत विश्वावर शोककळा पसरली आहे. मुंबईतल्या ब्रीचकँडी रुग्णालयात त्यांनी अखेरचा श्वास घेतला. गेल्या काही दिवसांपासून त्यांना आजाराने ग्रासलं होतं. मात्र आज अखेर त्यांची मृत्यूशी सुरु असलेली झुंज अपयशी ठरली. पंकज यांच्या कन्या नायाब उधास यांनी वडिलांच्या मृत्यूची बातमी पोस्ट केली आहे. आम्ही अत्यंत दुःखात आहोत आणि हे तुम्हाला सांगत आहोत की पद्मश्री पंकज उधास यांचं निधन झालं. मागच्या दहा दिवसांपासून त्यांच्यावर उपचार सुरु होते.

## भारताने 5 विकेटने जिंकली रांची टेस्ट:सीरीजवर कब्जा; रोहित-गिलची अर्धशतके



**रांची**

टीम इंडियाने रांची कसोटीत इंग्लंडचा 5 विकेट्सने पराभव केला. सोमवारी चौथ्या दिवशी संघाने 5 गडी गमावून 192 धावांचे लक्ष्य गाठले. या विजयासह टीम इंडिया मालिकेत 3-1 ने पुढे आहे, म्हणजेच पाच सामन्यांची मालिकाही जिंकली आहे.

इंग्लिश संघ तिसऱ्या दिवसाच्या तिसऱ्या सत्रात दुसऱ्या डावात सर्वबाद 145 धावांत आटोपला. पहिल्या डावात इंग्लंडच्या 46 धावांच्या आघाडीच्या जोरावर भारताला 192 धावांचे लक्ष्य मिळाले. तत्पूर्वी, इंग्लंडचा संघ पहिल्या डावात 353 धावांवर तर भारतीय संघ 307 धावांवर आटोपला.

ध्रुव जुरेल आणि शुभमन गिल यांच्यातील पन्नास भागीदारी पूर्ण झाली आहे. इंग्लंडकडून टॉम हार्टलीने 59वी गोलंदाजी केली. या चेंडूवर एकेरी घेत गिलने जुरेलसोबतची अर्धशतकी भागीदारी पूर्ण केली.

जडेजानंतर दुसऱ्याच चेंडूवर शोएब बशीरने सरफराज खानला बाद केले. सरफराजला खातेही उघडता आले नाही.

## विरार-पालघर अंतर 15 मिनिटांत गाठता येणार

**मुंबई**

अलीकडेच वसई ते भाईंदरपर्यंत रो-रो सेवा सुरू झाली आहे. त्यानंतर आता पालघर ते विरारपर्यंत आणखी एक रो-रो सेवा सुरू होणार आहे. या रो-रो सेवेमुळं पालघर ते विरारपर्यंतचा प्रवास 15 ते 20 मिनिटांवर येणार आहे. सध्या या प्रवासासाठी एक ते दीड तासांचा वेळ लागतो. मात्र, जलमार्गाने हे अंतर कमी होणार आहे. तसंच, यामुळं इंधनाचीही बचत होणार आहे.



विरार ते पालघर रोरो सेवेसाठी विरारमधील नारंगी जेट्टी तयार झाली आहे. तर, पालघरमधील खारवाडेश्वर रोरो जेट्टी उभारण्यासाठी सर्व प्रकारच्या मंजुरी मिळाल्या आहेत. या जेट्टीसाठी शासनाने 223.68 कोटींचा निधी मंजुर केला आहे. सागरी महामंडळाच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांनी ही माहिती दिली आहे. ही जेट्टी सुरू झाल्यानंतर प्रवासाचे अंतर कमी होणार आहे.

वसई-विरारकरांना रस्ते मार्गाने पालघर गाठण्यासाठी एक ते दीड तासांचे अंतर पार करावे लागते. सध्या अहमदाबाद महामार्गाने पालघरला जाण्यासाठी दीड तासांचा वेळ लागतो. तसंच, वाहतुक कोंडीत अडकल्यास वेळ अधिक लागू शकतो. सकाळी व संध्याकाळी वाहतुक कोंडीचा सामना करावा लागतो अशावेळी चालकांना मनस्ताप सहन करावा लागतो. तसंत, रेल्वेने पालघरला जाण्यासाठीही तितकाच वेळ लागतो. त्यात विरारहून पालघरला जाण्यासाठी लोकलदेखील कमी धावतात. अशावेळी रोजच्या चाकरमान्यांची लोकलला अधिक गर्दी असते. अशावेळी विरार ते पालघर हा जलमार्ग नागरिकांसाठी सोयीचा ठरू शकतो.

तसंच, पालघर येथे जिल्हा मुख्यालय आहे. त्यामुळं वसई-विरारच्या नागरिकांना सरकारी कामांसाठी पालघरला जावेच लागते. अशावेळी रेल्वे किंवा रस्तेमार्गे प्रवास करण्याऐवजी हा पर्याय खूपच सोयीचा ठरु शकणार आहे. विरार ते पालघर रस्ते मार्गे साधारण 60 किमी आहे. तर, तर वसई ते पालघर रस्स्ते साधारण 56.1 किमी आहे. मात्र, जलमागे हे अंतर फक्त 3 किलोमीटरवर येणार आहे. त्यामुळं वेळेची बचत होणार आहे.

विरारची नारंगी रोरो जेट्टीचे काम सुरू झाले आहे तर, पालघरच्य खारवाडेश्वर रोरो जेट्टीला आता सर्व प्रकारच्या मंजुऱ्या मिळाल्या आहेत. येत्या 18 महिन्यात म्हणजे दीड वर्षात हे काम सुरू होणार आहे. तर, लवकरच जलमार्ग सुरू होणार आहे.

### वसई ते भाईंदर समुद्रात रो रो सेवेला सुरुवात

वसई विरार व मीरा भाईंदर शहरातील अंतर कमी करणारी रो रो सेवा आज पासून प्रायोगिक तत्वावर सुरु करण्यात आली आहे. या सेवेमुळे नागरिकांचा वेळ वाचणार आहे. सुवर्णदुर्ग शिपींग व मरीन सर्वीसेस प्रा. लि. यांच्या मार्फत चालविली जाणाऱ्या या जान्हवी या फेरीबोटीची क्षमता ३३ वाहने व १०० प्रवाशी इतकी असणार आहे. अवघ्या दहा ते पंधरा मिनिटाचा हा समुद्री मार्ग असणार आहे. ही सेवा ३ महिन्याच्या प्रायोगिक तत्त्वावर सुरु करण्यात आली असून भरती व आहोटीच्या वेळी या फेरीबोटीच्या मार्गात बदल होणार असल्याची माहिती महाराष्ट्र सागरी मंडळाकडून देण्यात आली आहे. आज या समुद्री मार्गातील रो रो सेवेची सुरुवात झाल्यानंतर अनेक स्थानिक नागरिकांनी या बोटीतून प्रवास केला.

## कायदा सुव्यवस्था राखण्यात पोलिसांप्रमाणेच नागरिकांचाही सहभाग महत्त्वाचा – मुनगंटीवार

**चंद्रपूर**

शहरात सुव्यवस्था राखण्यासाठी पोलिस प्रशासन पूर्णपणे प्रयत्नशील आहे. शहरातील कायदा व सुव्यवस्था सांभाळण्यासाठी पोलिसांप्रमाणेच नागरिकांचाही सहभाग महत्त्वाचा असून कायदा व सुव्यवस्थेच्या बाबतीत चंद्रपूर जिल्हा राज्यात अग्रेसर राहावा, अशी अपेक्षा राज्याचे वने, सांस्कृतिक कार्य व मत्स्य व्यवसाय मंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री सुधीर मुनगंटीवार यांनी व्यक्त केली. पोलीस परेड ग्राउंड येथे आयोजित पोलीस एक्स्पो कार्यक्रमाप्रसंगी ते बोलत होते.

समाजामध्ये पोलीस आदर्श नागरिक असून समाजाचे रक्षण करण्याची जबाबदारी त्यांच्या खांद्यावर असते, असे सांगून पालकमंत्री सुधीर मुनगंटीवार म्हणाले, पोलिसांप्रमाणेच कायदा व सुव्यवस्थेची जबाबदारी नागरिकांची देखील आहे. आदर्श गाव होण्यासाठी तसेच गाव पातळीवर किंवा त्यांच्या कार्यक्षेत्रातील गुन्हे रोखण्यासाठी पोलीस पाटील हा महत्त्वाचा घटक आहे. समाज व पोलीस पाटील यांच्या समन्वयातून महाराष्ट्रातील 36 जिल्ह्यांपैकी चंद्रपूर जिल्हा कायदा व सुव्यवस्थेच्या बाबतीत अग्रेसर व्हावा, इतरांनी या जिल्ह्याच्या प्रशासनाचा हेवा करावा, पोलीस विभागाचे कौतुक करावे, असे काम जिल्ह्यात व्हावे. नवचैतन्य प्रदर्शनीतून गावातील प्रत्येक नागरिकांपर्यंत चैतन्य पोहोचवायचे आहे. पोलीस विभागाला भौतिक संसाधनाची आवश्यकता असल्यास त्या सर्व संसाधनासाठी निधी उपलब्ध करून देणार असल्याचे ते म्हणाले.

## नितेश राणे 'वेडा आमदार'



**अकोला ।** भाजप आमदार नितेश राणे यांच्याकडून सातत्याने होणाऱ्या पोलिसांवरील वादग्रस्त व्यक्तव्यानंतर विरोधकांनी नितेश राणे यांच्यासह सत्ताधाऱ्यांना चांगलेच धारेवर धरले आहे. अशातच आता वंचित बहुजन आघाडीचे सर्वेसर्वा आणि अध्यक्ष प्रकाश आंबेडकर यांनी नितेश राणे यांचा उल्लेख 'वेडा आमदार' असा केलाय. प्रकाश आंबेडकरांनी नितेश राणेंच्या पोलिसांवरील वादग्रस्त वक्तव्यावर बोलताना त्यांना फार महत्त्व देऊ नये असं म्हटलंय. त्यांच्या वक्तव्यामुळे फार काही फरक पडणार नाही. यासोबतच पोलिसांनी आणि जनतेनेही त्यांच्या बोलण्याकडे फार लक्ष देऊ नये, असंही आंबेडकर यावेळी म्हणाले आहेत.

## बारसकरांवर हल्ल्याचा प्रयत्न



**मुंबई ।** सरकारकडून मराठ्यांना स्वतंत्र 10 टक्के आरक्षण देण्याच्या निर्णय दिल्यानंतर अवघ्या काही तासांमध्येच अजय बारसकर यांनी मराठा आंदोलनकर्ते मनोज जरांगे यांच्यावर आरोप केले होते. यानंतर आता मराठा समाजाच्या रोषाला अजय बारसकर यांना जावं लागलं आहे. अजय बारसकर यांच्यावर आज मुंबईत हल्ल्याचा प्रयत्न झाला. आज चर्चगेट परिसरामध्ये बारसकर प्रवास करत असताना काही लोकांनी त्यांच्यावर हल्ल्याचा प्रयत्न केल्याची माहिती बारसकर यांनी दिली. मरीन ड्राइव्ह पोलिसांनी हल्लेखोरांना अडवत ताब्यात घेतलं आहे. या घटनेनंतर बारसकर यांची सुरक्षा वाढवण्यात आली आहे.

# भविष्यात त्यांच्यासोबत जाऊ असे वाटत नाही!

प्रतिनिधी
मुंबई



शिवसेना (ठाकरे) पक्षप्रमुख उद्धव ठाकरे माझे चांगले मित्र होते. पण आता आम्ही मनाने वेगळे झालोय. त्यामुळे भविष्यात आम्ही त्यांच्यासोबत जाऊ असे मला वाटत नाही, अशा शब्दांत उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी शुक्रवारी ठाकरेंसोबतच्या आपल्या राजकीय मैत्रीवर भाष्य केले.

देवेंद्र फडणवीस यांनी शुक्रवारी एका वृत्तवाहिनीच्या कार्यक्रमात वेगवेगळ्या विषयांवर आपले मत व्यक्त केले. त्यात त्यांना उद्धव ठाकरे तुमचे मित्र होते, आज नाहीत का? असा थेट प्रश्न करण्यात आला. त्यावर बोलताना त्यांनी आम्ही आता मनाने वेगळे झाल्याचे स्पष्ट केले. मित्र कुणाला म्हणतात? हे तुम्ही उद्धव ठाकरे यांना विचारा. मी त्यांनी केलेला फोन सलग 5 वर्षे उचलला. पण त्यांनी एकदाही उचलला नाही. त्यांनी आम्हाला आपली युती होऊ शकत नाही, असे तरी सांगायचे होते. त्यांनी स्वतःच दरवाजा व रस्ता बंद केला. त्यानंतर आमचे केव्हाच बोलणे झाले नाही. उद्धव ठाकरे मित्र होते. पण आता आम्ही मनाने वेगळे झालोत. त्यामुळे भविष्यात त्यांच्यासोबत जाऊ असे मला वाटत नाही, असे फडणवीस म्हणाले.

यावेळी त्यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्यावर होणाऱ्या टीकेवरही भाष्य केले. पंतप्रधान मोदी यांना शिव्या दिल्याशिवाय त्यांना जेवण जात नसेल. त्यांचे काही लोक सकाळी उठल्यापासून मोदींवर टीका करतात. राजकारणात काही मुद्दे असतात. पण 25 वर्षे आम्ही ज्यांच्यासोबत सुखदुःख वाटले असे लोक आमच्या नेत्यांवर बोलतात तेव्हा आमचे काळीज तुटते, असेही देवेंद्र फडणवीस यावेळी खासदार संजय राऊत यांच्यावर बोलताना म्हणाले.

मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्यासोबत आमची इमोशनल आघाडी आहे. याउलट अजित पवार यांच्यासाठी आघाडी ही एक रणनीती आहे, असेही फडणवीस यांनी स्पष्ट केले.

# 'महायुती' लोकसभा निवडणुकीच्या प्रचाराचे रणशिंग 2 मार्चला फुंकणार

## मुख्यमंत्री आणि दोन्ही उपमुख्यमंत्री उपस्थित राहणार

प्रतिनिधी
बारामती



मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व अजित पवार हे २ मार्च रोजी बारामतीत येत आहेत. त्यांच्या हस्ते येथे विविध विकासकामांची उद्घाटने होणार असून, नमो महारोजगार मेळाव्याचेही आयोजन करण्यात आले आहे. आचारसंहितेपूर्वी बारामतीतील विकासकामांची उद्घाटने व्हावीत, असा अजित पवार यांचा आग्रह होता. यानिमित्त महायुती लोकसभा निवडणुकीच्या प्रचाराचे रणसिंग बारामतीतून फुंकेल, अशी चिन्हे आहेत.

बारामती शहरातील अत्याधुनिक बसस्थानक, बऱ्हाणपूर येथील पोलिस उपमुख्यालय व उपविभागीय पोलिस अधिकारी कार्यालयानजीक उभारण्यात आलेल्या पोलिस वसाहतींचे उद्घाटन २ मार्च रोजी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व अजित पवार यांच्या हस्ते होईल. त्यासाठी आता बारामतीतील प्रशासकीय यंत्रणा कमालीची गतिमान झाली आहे.

शहराच्या मध्यवर्ती ठिकाणी प्रशस्त बसस्थानकाची उभारणी करण्यात आली आहे. ५० कोटी रुपये खर्चून हे बसस्थानक उभारण्यात आले आहे.

विमानतळाच्या धर्तीवर बसस्थानकाचा आराखडा बनविला असून, एकाच वेळेस फलाटावर २२ बसेस, तर रात्री मुक्कामी ८० बसेस उभ्या राहू शकतील अशी व्यवस्था करण्यात आली आहे. जिल्हा ग्रामीण पोलिस दलाचा ताण कमी व्हावा, या उद्देशाने बऱ्हाणपूरला पोलिस उपमुख्यालय उभारण्यात आले आहे. त्यानंतर हे सर्वजण नमो महारोजगार मेळाव्याला उपस्थित राहणार आहेत.

# आमच्या एका हातात तुतारी अन् दुसऱ्या हातात मशाल!

प्रतिनिधी
नागपूर



महायुतीचे वातावरण राज्यात कुठेच नाही ते फक्त जाहिरातीतच दिसत आहे. जनतेच्या पैशाची उधळपट्टी करत वर्तमानपत्र, टीव्ही, सोशल मीडियावर मोठ्या प्रमाणात जाहिरातबाजी सुरु आहे, परंतु जनभावना मात्र वेगळ्या आहेत. शरद पवार यांच्या राष्ट्रवादी काँग्रेसला तुतारी हे चिन्ह मिळाले आहे.

आता तर आमच्या एका हातात मशाल व दुसऱ्या हातात तुतारी आहे. हा भाजपाच्या तानाशाहीला संदेश आहे. या तुतारीत अत्याचारी व्यवस्थेला संपवण्याची क्षमता आहे, असा इशारा काँग्रेसचे प्रदेश अध्यक्ष नाना पटोले यांनी नागपुरात पत्रकारांशी बोलताना दिला. पटोले म्हणाले, निवडणुकीत महाराष्ट्रातील जनता भाजपा व त्यांच्या मित्रपक्षांना जागा दाखवल्याशिवाय राहणार नाही. बारामतीच्या जागेवरही शरद पवार यांच्या राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचाच उमेदवार निवडून येणार आहे.

भाजपा व त्यांचे मित्रपक्ष मीडियातून वातावरण निर्मिती करत आहेत प्रत्यक्षात चित्र वेगळे आहे. अजित पवार यांनी बारामतीत बिर्याणीचा कार्यक्रम ठेवला होता परंतु ते शरद पवारांविरोधात बोलायला लागले की लोक निघून गेले. शरद पवार यांनी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाला जन्म दिला परंतु या अत्याचारी व्यवस्थेने त्यांचा पक्ष व घड्याळ चिन्हही चोरून घेतले, अशी टीका त्यांनी केली.

# "मोदी सुना रहे हैं नानी को ननिहाल का हाल..."

## राहुल गांधींचा पंतप्रधानांवर वाराणसी स्टाइलमध्ये पलटवार

लखनौ



काँग्रेसचे माजी अध्यक्ष तथा खासदार राहुल गांधी यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्यावर निशाणा साधला आहे. त्यांनी उत्तर प्रदेशातील पेपर लीक प्रकरणाचा उल्लेख करत एक ट्विट केले आहे. त्यांनी एक व्हिडिओ ट्विट करत कॅप्शनमध्ये लिहिले, "लखनौ ते प्रयागराजपर्यंत पोलीस भरती पेपरफुटीच्या मुद्द्यावर तरुण रस्त्यावर उतरले आहेत आणि तेथून अवघ्या 100 किलोमीटर अंतरावर असलेल्या वाराणसीतून पंतप्रधान तरुणांच्या नावावर तरुणांचीच दिशाभूल करत आहेत. याच ट्विटमध्ये पुढे राहुल गांधी यांनी म्हटले आहे, "थेट वाराणसीच्याच अंदाजात सांगायचे तर, मोदीजी नानी को ननिहाल का हाल सुना रहे हैं।''

"जे स्वतः शुद्धीत नाहीत, ज्यांची संवेदना संपुष्टात आली आहे, ते काशी, यूपीच्या मुलांना अंमली पदार्थांचे व्यसनी म्हणत आहेत. येथील तरुणाई विकसित यूपी बनवण्यात व्यस्त आहे, हे लक्षात ठेवा. इंडिया आघाडीने यूपीतील तरुणांचा केलेला अपमान कधीही विसरता येणार नाही," असे पंतप्रधान मोदी यांनी स्पष्ट शब्दांत सांगितले. ते प्रत्येक निवडणुकीच्या वेळी एकत्र येतात आणि निकाल शून्य आला की, एकमेकांना शिव्या देऊन वेगळे होतात, असा टोला पंतप्रधान मोदी यांनी लगावला होता.

# दिल्लीपुढे झुकणार नाही

## आजोबांच्या राष्ट्रवादीला 'तुतारी' चिन्ह मिळताच युगेंद्र पवार आक्रमक

प्रतिनिधी
बारामती

उपमुख्यमंत्री अजित पवार यांचे पुतणे आणि शरद पवार यांचे नातू युगेंद्र पवार यांनी अजित पवारांना सोडून शरद पवारांना साथ देण्याचा निर्णय घेतला आहे. शरद पवारांनी १९९९ मध्ये राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाची स्थापना केली. मात्र २०२३ मध्ये या पक्षात फूट पडली. अजित पवार एक मोठा गट घेऊन वेगळे झाले. त्यानंतर राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष हे नाव आणि घड्याळ हे पक्षचिन्ह अजित पवारांना मिळालं आहे. या सगळ्यानंतर युगेंद्र पवार यांनी शरद पवारांना साथ देण्याचा निर्णय घेतला आहे. त्यांनी जी पोस्ट केली आहे ती आता चर्चेत आहे.

शरद पवारांच्या गटाला 'तुतारी' हे पक्षचिन्ह मिळाल्यानंतर आज युगेंद्र पवार यांनी फेसबुक पोस्ट केली आहे. या फेसबुक पोस्टने लक्ष वेधलं आहे. युगेंद्र पवार यांनी शरद पवारांबरोबरचा फोटो पोस्ट केला आहे. त्याला त्यांनी कॅप्शन दिली आहे 'दिल्लीपुढे न झुकण्याचा छत्रपती शिवरायांनी



शिकविलेला स्वाभिमानी बाणा जपण्यासाठी आम्ही सज्ज आहोत. जय जिजाऊ, जय शिवराय', अशी पोस्ट युगेंद्र पवार यांनी केली आहे. जी चांगलीच चर्चेत आहे.

बारामती लोकसभा मतदारसंघावरून पवार कुटुंबीयांत आरोप-प्रत्यारोपांचं सत्र सुरू आहे. अजित पवार यांनी पहिल्यांदा शरद पवार आणि सुप्रिया सुळे यांच्यावर टीका केल्यानंतर आता ते स्वतः बारामती पिंजून काढण्यास सुरुवात केली आहे. इतकंच नव्हे, तर पत्नी सुनेत्रा पवार यांनी सुद्धा आता बारामती लोकसभा मतदारसंघांमध्ये विविध कार्यक्रमांना उपस्थिती लावत वातावरण तापवण्यास सुरुवात केली आहे.

शरद पवार कुटुंबात पहिली राजकीय ठिणगी ही बारामती लोकसभा मतदारसंघांमध्ये पडणार आहे. अजित पवार सातत्याने मला कुटुंबांकडून एकटे पाडले जाईल, तुम्ही एकटे पाडू नका अशा प्रकारची वक्तव्ये बारामती लोकसभा मतदारसंघांमध्ये करत आहेत. त्याला शरद पवार आणि सुप्रिया सुळे यांनी सुद्धा जोरदार प्रत्युत्तर दिलं आहे.

### 'नवीन चिन्ह, नवीन सुरुवात' शरद पवार फुंकणार प्रचाराची 'तुतारी'... रायगडावर भव्य लाँचिंग सोहळा

*छत्रपती शिवाजी महाराजांच्या हिंदवी स्वराज्याची राजधानी किल्ले रायगडावर शरदचंद्र पवार गट तुतारीने निवडणुकीचं रणशिंग फुंकणार आहे. राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार या पक्षाला केंद्रीय निवडणूक आयोगाने तुतारी वाजवणारा माणूस हे चिन्ह दिलंय. शरद पवार गट आगामी लोकसभा आणि विधानसभा निवडणुकीत तुतारी घेऊन रिंगणात उतरणार आहे. आणि याच तुतारी चिन्हाचा किल्ले रायगडावर भव्य लॉन्चिंग सोहळा होणार आहे. 1978 साली शरद पवारांनी सर्वात तरुण मुख्यमंत्री होण्याचा मान मिळवला.सोनिया गांधींच्या विदेशी मुद्द्यावरुन शरद पवारांनी काँग्रेस पक्ष सोडला. राष्ट्रवादी काँग्रेस या नवीन पक्षाची स्थापना करत घड्याळ चिन्ह राज्यात घरोघरी पोहोचवलं. मविआचं सरकार स्थापन करत पवारांनी भाजपला धोबीपछाड दिली. आता पुतण्या अजित पवारांनी साथ सोडल्याने पुन्हा पवारांसमोर आव्हानात्मक स्थिती उभी राहीली आहे.*



# पडवी येथील रायगड जिल्हा परिषद प्राथमिक शाळेचे वार्षिक स्नेह संमेलनाचे आयोजन

रायगड

ता. महाड, जि. रायगड, गाव पडवी येथील रायगड जिल्हा परिषद प्राथमिक शाळेचे वार्षिक स्नेहसंमेलन २०२३-२०२४ आयोजित करण्यात आले होते. ह्यात शाळेतील विद्यार्थी यांचे विविध गुणदर्शन कार्यक्रम शाळेच्या प्रांगणात संपन्न झाले. ह्या विध्यार्थींना प्रोत्साहन देण्यासाठी कौतुकाची थाप पाठीवर पडावी ह्या करीता विध्यार्थी पालक, शाळेतील मुख्यधापक, सर्व शिक्षक वृंद, अध्यक्ष, उपाध्यक्ष, सदस्य व शाळा व्यवस्थापन समिती, सरपंच, उपसरपंच अदी मान्यवर ह्या सोहळयास उपस्थित होते. मुलांचे कबडी सह विविध खेळाचे प्रकार ठेवण्यात आले होते. नाच गाणी देखील झाले. शाळेचे मूख्याध्यापक कोलपे सर व ईतर सह शिक्षक यांनी खूप मेहनत घेतली, मागील वर्षी माजी विद्यार्थी यांच्या योगदानातून शाळेचे नूतनीकरण देखील करण्यात आले होते, राकेश तांदलेकर, विशाल साळूंके, राजू साळूंके, अंकूश साळूंके, स्वप्नील साळूंके, वैभव साळूंके, किशोर साळूंके व चंद्रकांत साळूंके जे.जे.रूग्णालय मुंबई यांच्या प्रयत्नाने शाळेचे रूप पालटले. ह्यामुळे कार्यक्रमाची शोभा वाढली. मूलांनी सादर केलेली गाणी व विविध खेळ पाहताना आनंद झाला. हा नेत्रदिपक सोहळा गावकऱ्यांना खूप आवडला ह्यात महिला मंडळ पडवी यांचा सहभाग खूप मोलाचा होता. सुंदर व अविस्मरणीय कार्यक्रम असा झाला. अशी सदरची माहिती श्री. चंद्रकांत दादा साळूंके ह्यांनी दिली.

# आशा सेविकांच्या मागण्यांबाबत शासन सकारात्मक – उपमुख्यमंत्री अजित पवार

मुंबई



मुंबईतील आझाद मैदान येथे विविध मागण्यांसाठी आंदोलन पुकारलेल्या आशा सेविकांच्या मागण्यांबाबत शासन सकारात्मक असल्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी सांगितले.

विरोधी पक्षनेते विजय वडेट्टिवार यांनी विधानसभेमध्ये याबाबतचा मुद्दा उपस्थित केला होते. त्यास उत्तर देताना उपमुख्यमंत्री श्री. पवार म्हणाले की, शासन आशा सेविकांच्या मागण्यांबाबत सकारात्मक आहे. आंदोलकांनी सहकार्याची भूमिका घ्यावी, असे आवाहनही त्यांनी केले. चर्चा करून आशा सेविकांचे प्रश्न सोडवले जातील, असेही उपमुख्यमंत्री श्री. पवार यांनी सांगितले.

# शालेय शिक्षण मंत्री दीपक केसरकर यांच्यासमवेत चर्चेनंतर कनिष्ठ महाविद्यालय शिक्षक संघाचा उत्तरपत्रिका तपासणीवरील बहिष्कार मागे

मुंबई

शालेय शिक्षण मंत्री दीपक केसरकर यांनी कनिष्ठ महाविद्यालय शिक्षक संघाच्या विविध मागण्यांसंदर्भात त्यांच्या पदाधिकाऱ्यांबरोबर आज बैठक घेतली. यावेळी झालेल्या सकारात्मक चर्चेनंतर शिक्षक संघाने इयत्ता बारावीच्या उत्तरपत्रिका तपासणीवर टाकलेला बहिष्कार मागे घेतला असल्याचे मंत्री श्री.केसरकर



यांनी जाहीर केले.

शालेय शिक्षण मंत्री दीपक केसरकर यांच्या अध्यक्षतेखाली पंधरा दिवसांपूर्वी बैठक झाली होती. त्यात आयटी आणि इतर शिक्षकांचे समायोजन, १२ आणि २४ वर्षानंतरची कालबद्ध पदोन्नती, २४ वर्षानंतर २० टक्क्याप्रमाणे दिल्या जाणाऱ्या पदोन्नतीऐवजी एकाच वेळेला सर्वांना पदोन्नती देणे, याचप्रमाणे काही दीर्घकालीन मागण्यांसंदर्भात सकारात्मक चर्चा करण्यात आली. यापैकी वित्त विभागाशी संबंधित असलेल्या मागण्यांचे प्रस्ताव वित्त विभागाकडे दिले जाणार आहेत. तर, दीर्घकालीन मागण्यांबाबत शासन स्तरावर स्थापन समिती निर्णय घेणार आहे. समिती जे निर्णय घेईल ते सर्वांनाच लागू असतील.

आज याबाबत पुन्हा चर्चा झाल्यानंतर कनिष्ठ महाविद्यालयाच्या शिक्षकांचे प्रश्न सुटल्यामुळे त्यांनी आपला पेपर तपासणीवरचा बहिष्कार मागे घेतल्याचे जाहीर केल्याबद्दल मंत्री श्री. केसरकर यांनी त्यांचे आभार मानले आहेत.

मंत्री श्री.केसरकर म्हणाले, वेळोवेळी होणाऱ्या आंदोलनाचा परिणाम विद्यार्थ्यांच्या प्रगतीवर होत असतो, यामुळे शिक्षकांचे जवळजवळ सर्वच प्रश्न गेल्या वर्ष सव्वा वर्षांमध्ये सोडविण्यात आले आहेत. मोठ्या प्रमाणावर शिक्षक भरती, टप्पा अनुदान लागू करणे आदी महत्त्वपूर्ण निर्णय घेण्यात आले आहेत. टप्पा अनुदानाचा सर्वाधिक निधी कनिष्ठ महाविद्यालयाला देण्यात येत आहे.

कनिष्ठ महाविद्यालय शिक्षक संघटना आजपर्यंत कधीही संपावर गेलेली नाही. ज्या ज्या वेळेला ते आपल्या मागण्या घेऊन पुढे येतात त्याला शासनाने सकारात्मक प्रतिसाद दिला आहे. आजच्या सकारात्मक चर्चेनंतर शिक्षक शिक्षणावर अधिक एकाग्रतेने लक्ष देतील आणि शिक्षणात महाराष्ट्र पहिल्या क्रमांकावर येईल, असा विश्वास मंत्री श्री. केसरकर यांनी व्यक्त केला.

सर्व शिक्षकांना आणि विद्यार्थ्यांना शुभेच्छा देऊन बारावीच्या परीक्षेचे निकाल वेळेवर जाहीर होतील, असा विश्वास मंत्री श्री.केसरकर यांनी व्यक्त केला. कनिष्ठ महाविद्यालय शिक्षक संघाने दिलेल्या सहकार्याबद्दल त्यांनी शिक्षकांचे आभार मानले.

# सुप्रसिद्ध मराठी साहित्यिक योगेश मोरे यांनी विद्यार्थांना केले मार्गदर्शन



छत्रपती संभाजीनगर

छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातील गंगापुर तालुक्यातील सुप्रसिध्द मराठी साहित्यिक,गीतकार, संगीतकार, कथा, लेखक तथा पत्रकार संघटनेचे महाराष्ट्र राज्यसचिव योगेश तुळशीराम मोरे यांना ज्योती मंदिर विद्यालय,हर्सूल टी पॉइंट छत्रपती संभाजीनगर येथे इयत्ता दहावीच्या विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करण्यासाठी प्रमुख अतिथी म्हणून आमंत्रित करण्यात आले होते.तसेच मराठी साहित्यिक "योगेश मोरे"विद्यार्थांना म्हणाले की, विद्यार्थ्यांनी शाळेच्या अभ्यासाबरोबरच स्वतः मधील कला गुणांना आत्मसात करून नक्कीच स्वत:च्या प्रगतीकडे वाटचाल करून आपल्या भारत देशाचं नाव लौकिक करावं! असे प्रतिपादन योगेश मोरे यांनी मार्गदर्शनप्रसंगी केले.तसेच योगेश मोरे यांची स्वलिखित "भरकटलेल्या पक्ष्याचा किलबिलाट" कादंबरीच्या प्रमुख प्रती शाळेस भेट म्हणून दिल्या.तसेच शाळेच्या माजी विद्यार्थिनी अलकनंदा नाथाजी नांदे यांनीदेखील विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.कार्यक्रमाप्रसंगी डॉ.विनोद सिनकर सरस्वती भुवन हायस्कूल, ॲडव्होकेट सुधीर कुलकर्णी, मुख्याध्यापिका श्रीमती सुनंदा चव्हाण, श्रीमती स्मिता शिवणीकर,श्रीमती कांचन सवडतकर,श्रीमती अनुराधा भगत,श्रीमती विद्या भगत,श्रीमती ईश्वरी सोनटकर,श्रीमती सविता पाटील,श्रीमती स्वाती बागुल,शोभा पांडे,ज्योती तायडे आदी शिक्षकवृंद व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.तसेच मुख्याध्यापिका श्रीमती सुनंदा चव्हाण यांनी मोरे यांच्या अमेझॉनवरील इंग्रजी भाषेत उपलब्ध असलेल्या द श्रील चर्प ऑफ अ लॉस्ट बर्ड या कादंबरीचे भरभरून कौतुक केले.


### प्रकट निवेदन

रेग्युलेशन ऑफ न्यूज पेपर्स (सेंट्रल रुल्स १९५६, नियम क्र.८) अन्वये दैनिक

मराठी अक्रॉस मुंबई

'वृत्तमानस' वृत्तपत्राची मालकी व इतर तपशीलासंबंधी निवेदन-

| | |
|---|---|
| प्रकाशन स्थळ | राजेंद्र पार्क, बिल्डिंग नं. २/२०, चौथा माला, स्टेशन रोड, गोरेगांव (प.) मुंबई -४००१०४ |
| प्रकाशनाचा प्रसिद्ध काल | साप्ताहिक |
| प्रकाशकाचे नाव | संजय मंगेश भैरे |
| राष्ट्रीयत्व | भारतीय |
| पत्ता | राजेंद्र पार्क, बिल्डिंग नं. २/२०, चौथा माला, स्टेशन रोड, गोरेगांव (प.) मुंबई -४००१०४ |
| मुद्रकाचे नाव | संजय मंगेश भैरे |
| राष्ट्रीयत्व | भारतीय |
| पत्ता | राजेंद्र पार्क, बिल्डिंग नं. २/२०, चौथा माला, स्टेशन रोड, गोरेगांव (प.) मुंबई -४००१०४ |
| संपादकाचे नाव | संजय मंगेश भैरे |
| राष्ट्रीयत्व | भारतीय |
| पत्ता | राजेंद्र पार्क, बिल्डिंग नं. २/२०, चौथा माला, स्टेशन रोड, गोरेगांव (प.) मुंबई -४००१०४ |
| स्वामित्व | संजय तेजसिंग खिमेसरा |
| वृत्तपत्राची मालकी ज्यांच्याकडे आहे अशा व्यक्ती व एकूण भांडवलाच्या एक टक्क्याहून अधिक भाग धारण करणारे भागधारक, त्यांची नावे व पत्ते | नाही |

मी असे घोषित करतो की, वर दिलेला तपशील माझ्या माहितीप्रमाणे आणि समजुतीप्रमाणे बरोबर आहे.

दि. ०१.०३.२०२४

संजय मंगेश भैरे
प्रकाशक

# मुंबई येथील अन्न चाचणी प्रयोगशाळेचे प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या हस्ते दूरदुष्य प्रणालीद्वारे उद्घाटन



मुंबई

सुरक्षा मानक प्राधिकरण नवी दिल्ली व अन्न व औषध प्रशासन महाराष्ट्र राज्य यांच्यातील सामंजस्य करारअंतर्गत मुंबई येथे उभारण्यात आलेल्या अन्न चाचणी मायक्रोबायोलॉजिकल प्रयोगशाळेचे उद्घाटन प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या हस्ते दूरदृष्यप्रणाली द्वारे उद्घाटन करण्यात आले. देशातील अन्न चाचणी प्रणाली बळकट करण्यासाठी अत्याधुनिक प्रयोगशाळा उभारण्यात येत आहेत.नवीन मायक्रोबायोलॉजी प्रयोगशाळा सुरु झाल्यानंतर अन्न चाचणीमध्ये महाराष्ट्र राज्य सक्षम तर होईलच त्याबरोबर महाराष्ट्र राज्य अन्न सुरक्षेच्या दृष्टीने पहिले पाऊल उचलेल असा विश्वास यावेळी अन्न व औषध प्रशासन मंत्री धर्मराव आत्राम बाबा यांनी व्यक्त केला.

यावेळी दूरदृष्य प्रणालीद्वारे झालेल्या समारंभा वेळी औषध प्रशासन मंत्री धर्मराव बाबा आत्राम, खासदार पूनम महाजन, आयुक्त (अन्न) अभिमन्यू काळे उपस्थित होते.

यावेळी मंत्री धर्मराव बाबा आत्राम म्हणाले की, अन्न चाचणी मायक्रोबायोलॉजी प्रयोगशाळेत अन्नसुरक्षा समिती करण्यासाठी कर्मचारी वर्ग इतर अनुषंगिक सुविधा देण्यात येणार आहेत. तसेच लॉजिकल विश्लेषण करण्यासाठी कर्मचारी वर्ग नियुक्त केले जाणार आहे. यासाठी राज्य शासनाकडे पाठपुरावा सुरु असल्याचे त्यांनी यावेळी सांगितले. सध्या राज्यामध्ये तीन प्रयोगशाळा असून आता त्या पाच ठिकाणी उभारण्यासाठी राज्य शासन प्रयत्नशील आहे. छत्रपती संभाजीनगर येथे मायक्रोबायोलॉजी प्रयोग शाळेसाठी प्रत्येकी 450 कोटीचा निधी केंद्र सरकारने दिलेला आहे. सदर निधी हा प्रयोगशाळा उभारण्यासाठी आणि उपकरणांसाठी तसेच तीन वर्ष तांत्रिक कर्मचाऱ्यांच्या खर्चासाठी दिलेला आहे. सध्या संभाजीनगर येथील प्रयोगशाळेचे काम पूर्ण होत आलेले आहे. महाराष्ट्र शासन या प्रयोगशाळा उभारणीचे कामकाज अचूक व जलद गतीने करण्यासाठी प्रयत्नशील आहे. लवकर संभाजीनगर येथील प्रयोगशाळेचे उद्घाटन करण्यात येणार असल्याचे त्यांनी सांगितले.


खासदार पूनम महाजन म्हणाल्या की, महाराष्ट्र प्रत्येक गोष्टीत अग्रणी आहे. भारतातून निर्यात होणाऱ्या अन्न निर्यातीमध्ये 15 टक्के वाटा महाराष्ट्राचा आहे, महाराष्ट्रात जवळपास प्रत्येक जिल्ह्यातून देशात आणि देशाबाहेर अन्न पुरवले जाते. अन्नावर प्रक्रिया करुन ते देशात-परदेशात निर्यात करणे ही शेतकऱ्याची ताकद आहे. सामान्य व्यक्तीला प्रथिनेयुक्त व भेसळविरहित अन्न देण्यासाठी एफडीआय चे अधिकारी व कर्मचारी मेहनत घेत आहेत. यानिनमित्ताने त्यांनी सर्व अधिकारी आणि कर्मचारी यांचे अभिनंदन केले.

या प्रयोगशाळा उद्घाटन समारंभास मान्यवर पदाधिकारी, विभागातील कर्मचारी अधिकारी तसेच नागरिक बहुसंख्येने उपस्थित होते. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन गौरी जोशी यांनी केले.

# मनोहर जोशी पंचत्वात विलीन

## हृदयविकाराच्या झटक्याने शुक्रवारी पहाटे झाले होते निधन

प्रतिनिधी
मुंबई



महाराष्ट्राचे माजी मुख्यमंत्री मनोहर जोशी यांच्यावर शुक्रवारी सायंकाळी शोकाकुल वातावरणात शासकीय इतमामात अंत्यसंस्कार करण्यात आले. यावेळी त्यांना मानवंदनाही देण्यात आली. शिवसेना (ठाकरे) पक्षप्रमुख उद्धव ठाकरे, राष्ट्रवादी काँग्रेसचे (श.प.) अध्यक्ष शरद पवार, माजी मुख्यमंत्री सुशीलकुमार शिंदे, मंत्री शंभूराज देसाई, खासदार संजय राऊत आदी नेते यावेळी उपस्थित होते.

मनोहर जोशी यांचे शुक्रवारी पहाटे 3 वाजण्याच्या सुमारास निधन झाले. वयाच्या 86 व्या वर्षी त्यांनी मुंबईत अखेरचा श्वास घेतला. गुरुवारी रात्री मनोहर जोशी यांना हृदयविकाराचा झटका आला होता. यानंतर त्यांना उपचारासाठी हिंदुजा रुग्णालयात दाखल करण्यात आले. मात्र, उपचार सुरू असताना त्यांची प्राणज्योत मालवली आहे. त्यांच्या निधनाने राजकीय वर्तुळावर शोककळा पसरली आहे.

मनोहर जोशी हे शिवसेनेच्या पहिल्या फळीतले नेते होते. शिवसेनेचे संस्थापक दिवंगत बाळासाहेब ठाकरे यांच्या निकटवर्तीयांपैकी जोशी होते. विधानपरिषदेचे आमदार, मुंबईचे महापौर, विरोधी पक्षनेते आणि शिवसेनेचे पहिले वहिले मुख्यमंत्री म्हणून अनेक पदे मनोहर जोशी भूषवली होती. गेल्या अनेक दिवसांपासून प्रकृती खराब असल्याने ते महाराष्ट्राच्या राजकारणापासून दूर होते. प्रकृती अस्वास्थामुळे मनोहर जोशी गेल्या बऱ्याच काळापासून सक्रिय राजकारणापासून दूर होते.

मनोहर जोशी यांचा जन्म 2 डिसेंबर 1937 ला रायगड जिल्ह्यातील नांदवी या गावी झाला. 1995 साली ते युतीच्या सत्तेत महाराष्ट्राचे मुख्यमंत्री झाले होते. बालपण-ध्येयाकडे खडतर सुरुवात सुसंस्कृत पण गरिब कुटुंबात जन्म झाल्यामुळे 'कमवा आणि शिका' या तंत्राने लहानपणापासूनच संघर्ष त्यांच्या नशीबी होता. वडिलांबरोबर भिक्षुकी करून पैसे मिळवू लागले.

प्रकृतीच्या कारणास्तव गेल्या काही काळापासून ते राजकारणात सक्रिय नव्हते. मनोहर जोशी यांनी मुंबई महापालिकेचे नगरसेवक, महापौर, विधान परिषदेचे सदस्य, आमदार, महाराष्ट्राचे मुख्यमंत्री, खासदार, केंद्रीय अवजड उद्योगमंत्री, लोकसभा अध्यक्ष आणि राज्यसभा सदस्य अशा विविध पदांवर काम केलं आहे.

## थोडक्यात

### फिल्मसिटीत निष्काळजीपणाचे दोन बळी - प्रिती सातम

**मुंबई:**गोरेगाव पूर्व, आरे कॉलनी रोड, फिल्मसिटी गेट नंबर २, प्राइम फोकस प्रोडक्शनच्या मागे ६० फूट लांब आणि २० फूट उंचीची भिंत पडून दोन जणांचा जागीच मृत्यू झाला. शुटींग करतांना वीस फूट उंचीची मोठी भिंत बांधत असताना त्याच्या स्ट्रक्चर ऑडिटच्या दृष्टिकोनातून कोणतीही काळजी न घेतल्याने असे प्रकार घडत आहेत. हे निष्काळजी पणाचे बळी असल्याचे स्थानिक माजी नगरसेविका प्रिती सातम यांनी म्हटले आहे. शनिवारी घटना घडल्यानंतर सातम यांनी तत्काळ घटनास्थळी धाव घेतली होती. कधी आग लागण्याची घटना, तर कधी भिंत पडण्याची दुर्घटना! फिल्म सिटीत अशा प्रकारे निष्काळजीपणाचे अजून किती लोकांचे बळी घेतले जाणार आहेत? फिल्म सिटीतील दुर्घटनेला फिल्म सिटी चे अधिकारी तेवढे जबाबदार आहेत असा आरोपही प्रिती सातम यांनी केला आहे.

### पोलिसांच्या रजेचे रोखीकरण 24 तासांत पुन्हा सुरु

**मुंबई:** पोलिसांना वर्षभरात लागू असलेल्या १५ दिवसांच्या अतिरिक्त रजेचे रोखीकरण रद्द करण्याचा निर्णय विद्यमान सरकारने घेतला. पण ओरड होताच तो निर्णय तात्काळ रद्दही केला. एकीकडे पोलिसांना रजा घेण्याचे बंधन असताना रजेचे रोखीकरण रोखण्याचा निर्णय नेमका कोणाचा होता आणि तो तात्काळ रद्द का करण्यात आला, याची चर्चा आता पोलीस दलात सुरु झाली आहे. राज्याच्या नव्या पोलीस महासंचालक रश्मी शुक्ला यांनी परिपत्रक जारी करून सेवानिवृत्त होणाऱ्या पोलिसांनी जाहीर सत्कार सोहळे स्वीकारून त्याच्या ध्वनिचित्रफित समाजमाध्यमांवर प्रसारित करण्यावर बंधने आणली आहेत. असे सत्कार स्वीकारणाऱ्या पोलिसांविरुद्ध कारवाई करण्याचे आदेश दिले आहेत. हे परिपत्रक ताजे असतानाच पोलिसांना लागू असलेल्या १५ दिवसांच्या अतिरिक्त रजेचे रोखीकरण रद्द करण्यात आल्याचा शासन निर्णय जारी झाल्यामुळे पोलीस संतापले. शासनाने या निर्णयाचे समर्थन करताना म्हटले होते की, सातव्या वेतन आयोगानुसार पोलीस कर्मचारी तसेच इतर कर्मचाऱ्यांच्या वेतनात भरीव वाढ झालेली आहे.

## कुशल मनुष्यबळ पुरविण्यासाठी जर्मनीतील बाडेन वुटेनबर्ग राज्यासोबत सामंजस्य करार

# युरोपियन देशांना कुशल मनुष्यबळ पुरविण्यासाठी महाराष्ट्राचा पुढाकार - मुख्यमंत्री

प्रतिनिधी
मुंबई



युरोपियन देशाच्या मागणीप्रमाणे त्यांना कुशल मनुष्यबळ पुरविण्यासाठी महाराष्ट्राने पुढाकार घेतला असून या अनुषंगाने महाराष्ट्र शासन आणि जर्मनीच्या बाडेन वुटेनबर्ग राज्यादरम्यान सामंजस्य करार करून सुरुवात झाली आहे. या करारामुळे दोन्ही राज्यांमधील परस्पर संबंध अधिक दृढ होतील, असा विश्वास मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी व्यक्त केला.

युरोपियन देशांची कुशल मनुष्यबळाची गरज पूर्ण करण्याच्या उपक्रमाच्या पूर्ततेच्या अनुषंगाने पहिले पाऊल म्हणून शासनस्तरावर शालेय शिक्षण, उच्च व तंत्र शिक्षण, कृषी, वैद्यकीय शिक्षण, उद्योग व कामगार, कौशल्य विकास आणि उद्योजकता या विभागाचे मंत्री आणि सचिव यांचा कृती गट स्थापन करण्यात आला आहे. या कृती गटाच्या निर्णयानुसार जर्मनीतील बाडेन बुटेनबर्ग या औद्योगिकदृष्ट्या अतिप्रगत राज्याशी आज सह्याद्री अतिथीगृह येथे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या प्रमुख उपस्थितीत सामंजस्य करार करण्यात आला. यावेळी शालेय शिक्षण मंत्री दीपक केसरकर, उच्च व तंत्र शिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील, वैद्यकीय शिक्षण मंत्री हसन मुश्रीफ, कामगार मंत्री सुरेश खाडे, संबंधित विभागांचे वरिष्ठ अधिकारी तसेच जर्मनीचे मिनिस्टर ऑफ स्टेट डॉ. फ्लोरियन स्टेगमन, शालेय शिक्षण, युवक आणि क्रीडा मंत्री थेरेसा स्कॉपर यांच्यासह जर्मनीचे शिष्टमंडळ उपस्थित होते.

मुख्यमंत्री श्री.शिंदे यांनी जर्मनीतील शिष्टमंडळाचे जर्मन भाषेत स्वागत केले. यानंतर मुख्यमंत्री श्री.शिंदे म्हणाले, भारत आणि जर्मनीचे अनेक दशकांपासून परस्पर संबंध आहेत. जर्मनीला कुशल मनुष्यबळाची आवश्यकता असून महाराष्ट्र ही गरज पूर्ण करण्यास समर्थ आहे. त्यादृष्टीने आज झालेला करार या संबंधांना अधिक बळकटी देणारा ठरणार आहे. या करारामुळे एका नवीन युगाची सुरुवात होणार असल्याचे त्यांनी नमूद केले.

मुख्यमंत्री म्हणाले, महाराष्ट्रात कुशल मनुष्यबळासह पायाभूत सुविधा, उत्कृष्ट दळणवळण सुविधा तसेच नवनवीन प्रकल्पांसाठी मुबलक जागा उपलब्ध आहे. महाराष्ट्र हे सर्वाधिक औद्योगिकीकरण झालेले राज्य आहे. महाराष्ट्रात मागील वर्षी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते प्रमोद महाजन ग्रामीण कौशल्य केंद्र सुरू करण्यात आले असून त्या माध्यमातून अधिकाधिक कुशल मनुष्यबळ उपलब्ध होणार आहे.

यावेळी मंत्री सर्वश्री दीपक केसरकर, चंद्रकांत पाटील, हसन मुश्रीफ, सुरेश खाडे यांनी संबंधित विभागांमार्फत कुशल मनुष्यबळाची निर्मिती आणि जर्मनीची गरज भागविण्यासाठी प्रयत्न करण्यात येणार असल्याचे सांगितले.

# अध्यात्मिक शक्तीने भारत विश्वगुरू बनेल- मंत्री लोढा



प्रतिनिधी
मुंबई

अयोध्येत २२ जानेवारी रोजी श्री राम मंदिराची प्राणप्रतिष्ठा संपन्न झाली. अयोध्येतील राम मंदिर साकारण्यात देशातील साधू संतांचे योगदान मोठे असून त्यांचे आशीर्वाद आहे. त्यामुळे संतांचा सन्मान करण्यासाठी तसेच विविध मठ/ मंदिर यांच्या समस्या जाणून घेण्यासाठी दिनांक २३ आणि २४ फेब्रुवारी रोजी " संत संमेलन" विलेपार्ले येथील सन्यास आश्रमात झाले.

महासंस्कृती महोत्सव २०२४ अंतर्गत , मुंबई उपनगर जिल्हा आयोजित हे संत संमेलन मुंबई उपनगराचे पालकमंत्री मंगलप्रभात लोढा यांच्या संकल्पनेने झाले. त्यांनी उपस्थित संतांवर पुष्पवृष्टी करून त्यांचे स्वागत केले. कार्यक्रमाचे उद्घाटन अखिल भारतीय धर्म जागरण प्रमुख शरदराव ढोले यांनी केले.या कार्यक्रमाचे अध्यक्ष स्थान महामंडलेश्वर विश्वेश्वरानंद महाराज हे होते. " आपल्या देशात आजादी अमृत महोत्सव साजरा होत आहे, त्या मध्ये ही संतांचा मोठा सहभाग होता. संस्कार हे मांदिरांमधून मिळतात. भारत विश्वगुरू अध्यात्मिक शक्ती ने बनेल" असे प्रतिपादन पालकमंत्री मंगल प्रभात लोढा यांनी केले. कर्तव्याच्या आधारावर जगणे म्हणजेच रामराज्य असणे आहे. गावा गावात जाऊन धर्म जागरण करावे असे मत शरदराव जी ढोले यांनी व्यक्त केले. दुसऱ्या दिवशी मंदिर आणि मठ यांचे विविध मार्गदर्शन करण्यासाठी सह धर्मादाय आयुक्त, श्रीमती. आभा कोल्हे, मुंबई महानगर पालिकेच्या संचालक ( नियोजन) डॉ. प्राची जांभेकर या उपस्थित होत्या.

# कनिष्ठ महाविद्यालय शिक्षक संघाचा उत्तरपत्रिका तपासणीवरील बहिष्कार मागे

## मंत्री दीपक केसरकर यांची यशस्वी मध्यस्थी

प्रतिनिधी
मुंबई

शालेय शिक्षण मंत्री दीपक केसरकर यांनी कनिष्ठ महाविद्यालय शिक्षक संघाच्या विविध मागण्यांसंदर्भात त्यांच्या पदाधिकाऱ्यांबरोबर आज बैठक घेतली. यावेळी झालेल्या सकारात्मक चर्चेनंतर शिक्षक संघाने इयत्ता बारावीच्या उत्तरपत्रिका तपासणीवर टाकलेला बहिष्कार मागे घेतला असल्याचे मंत्री श्री.केसरकर यांनी जाहीर केले. शालेय शिक्षण मंत्री दीपक केसरकर यांच्या अध्यक्षतेखाली पंधरा दिवसांपूर्वी बैठक झाली होती. त्यात आयटी आणि इतर शिक्षकांचे समायोजन, 12 आणि 24 वर्षानंतरची कालबद्ध पदोन्नती, 24 वर्षानंतर 20 टक्क्याप्रमाणे दिल्या जाणाऱ्या पदोन्नतीऐवजी एकाच वेळेला सर्वांना पदोन्नती देणे, याचप्रमाणे काही दीर्घकालीन मागण्यांसंदर्भात सकारात्मक चर्चा करण्यात आली. यापैकी वित्त विभागाशी संबंधित असलेल्या मागण्यांचे प्रस्ताव वित्त विभागाकडे दिले जाणार आहेत. तर, दीर्घकालीन मागण्यांबाबत शासन स्तरावर स्थापन समिती निर्णय घेणार आहे. समिती जे निर्णय घेईल ते सर्वांनाच लागू असतील.

आज याबाबत पुन्हा चर्चा झाल्यानंतर कनिष्ठ महाविद्यालयाच्या शिक्षकांचे प्रश्न सुटल्यामुळे त्यांनी आपला पेपर तपासणीवरचा बहिष्कार मागे घेतल्याचे जाहीर केल्याबद्दल मंत्री श्री. केसरकर यांनी त्यांचे आभार मानले आहेत. मंत्री श्री.केसरकर म्हणाले, वेळोवेळी होणाऱ्या आंदोलनाचा परिणाम विद्यार्थ्यांच्या प्रगतीवर होत असतो, यामुळे शिक्षकांचे जवळजवळ सर्वच प्रश्न गेल्या वर्ष सव्वा वर्षांमध्ये सोडविण्यात आले आहेत. मोठ्या प्रमाणावर शिक्षक भरती, टप्पा अनुदान लागू करणे आदी महत्त्वपूर्ण निर्णय घेण्यात आले आहेत.



**मुंबई ।** शिवसेना-युवासेना पुरस्कृत शिवशाही प्रतिष्ठानच्या वतीने शिवडी क्रॉस रोड येथील कार्यालयात संत शिरोमणी गुरू रोहिदास महाराज यांची ६४७ वी जयंती साजरी करण्यात आली तद्प्रसंगी ज्येष्ठ शिवसैनिक विलास भोपळे समई ज्योत प्रज्वलित करून अभिवादन करतांना सोबत प्रतिष्ठानचे संस्थापक/अध्यक्ष,माजी शाखाप्रमुख सुरेश गणपत काळे, उपशाखाप्रमुख विनोद भोपळे, ग्रा.सं.कक्षाचे प्रतिनिधी इम्तियाज खान, मुझफ्फर अन्सारी, मुझाहिद खान, सोहेब पटेल, संतोष गुरव, गीता घोलपे, अक्षय घोलपे, हर्षल चव्हाण, लिलेश मोकल, शुभम कांबळे, सुमेध जाधव आदी उपस्थित होते.

# .. अन्यथा जरांगेंना जशास तसे उत्तर देऊ

## भाजप आ. प्रविण दरेकरांचा इशारा

प्रतिनिधी
मुंबई



मनोज जरांगे पाटील यांनी आज राज्याचे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याविरोधात बेताल वक्तव्य केले. त्यांच्या या वक्तव्यावरून भाजपा विधानपरिषद गटनेते आमदार प्रविण दरेकर चांगलेच आक्रमक झाले आहेत. देवेंद्र फडणवीस यांना टार्गेट करून मनोज जरांगे पाटील सागर बंगल्यावर जाणार असतील तर त्यांना जशास तसे उत्तर देण्यासाठी आम्हालाही सागर बंगल्यावर थांबावे लागेल, असा गर्भीत इशारा दरेकर यांनी दिला आहे.

दरेकर म्हणाले की, जरांगे यांनी आता तोंड सांभाळून बोलण्याची आवश्यकता आहे. मराठा समाजाला जे आरक्षण पाहिजे होते ते सरकारने दिले आहे. आता नेमकं जरांगेला काय हवे आहे? जरांगेंना देवेंद्र फडणवीस यांना टार्गेट करून राजकारण करण्याचा कोणताही नैतिक अधिकार नाही. यामागचा बोलविता धनी कोण आहे हे खऱ्या अर्थाने सरकारने शोधण्याची आवश्यकता असल्याचेही दरेकरांनी म्हटले.

त्याचबरोबर मराठा समाजाने ७/१२ जरांगेच्या नावावर केलेला नाही. देवेंद्र फडणवीस यांना टार्गेट करून सागर बंगल्यावर चाल करून जरांगे जाणार असतील तर आम्हालाही ॲक्शनला रीॲक्शन द्यावी लागेल. एका प्रामाणिक भूमिकेतून आतापर्यंत मराठा समाजाने आपल्याला समर्थन दिले. तुम्ही आता पूर्ण राजकारणी झाला आहात. तुमचा बोलविता धनी कोण आहे हे महाराष्ट्राला नीट माहित आहे. ज्यांनी आपल्या हयातीत मराठा आरक्षण दिले नाही ते आता तुमच्या माध्यमातून देवेंद्र फडणवीसांना टार्गेट करण्याचा प्रयत्न करताहेत. जरांगे यांना फ्रस्टेशन आले आहे. फ्रस्टेशनपोटी जरांगे आता टोकाची भाषा करायला लागले आहेत. सरकारने, गृहखात्याने याची दखल घ्यावी. नाहीतर आम्हालाही सागर बंगल्यावर जशास तसे उत्तर द्यायला थांबावे लागेल, असा इशारा दरेकर यांनी दिला आहे.

# डोळ्यांच्या उपचारासाठी अत्याधुनिक निओ मशीनचे आशिष शेलार यांच्या हस्ते उद्घाटन

प्रतिनिधी
मुंबई



डॉ. वैशाल केनिया यांनी भारतात प्रथम व खासकरून मुंबईची आवश्यकता म्हणून डोळयांच्या उपचाराकरिता अत्याधुनिक निओ मशीन आणली आहे. आपली नजर चांगली असली पाहिजे त्यामुळे त्यांनी चांगले काम केले आहे. वर्षाचे ३६५ दिवस मुंबईकरांना ही सेवा पुरविण्याचे काम ते करतील. अशी आशा मुंबई भाजपचे अध्यक्ष, आमदार आशिष शेलार यांनी या आधुनिक डोळ्यांच्या उपचारासाठीच्या मशीनचे उद्घाटन करताना येथे व्यक्त केली.

मोतीबिंदू शस्त्रक्रिया दृष्टीत सुधारणा, लेसर केराटोकोनस रिंग शस्त्रक्रिया आता काही सेकंदात होणार आहे. गरीब गरजू रुग्णांना परवडणारी फेमटो झेड ८ निओ मशीन व झीमर ऑप्थॅल्मिक सिस्टिम्स एजीने काही सेकंदात उपचार होणार आहेत. स्वित्झर्लंडमध्ये तंत्रज्ञानाने तयार करण्यात आलेल्या या मशीन्समुळे डोळ्यांच्या प्रत्येक लहान-मोठ्या आजारावर यशस्वी उपचार करता येऊ शकतात. लेझर कॉर्नियल प्रत्यारोपण करणारी ही आशियातील पहिली मशीन असून लेझर दृष्टी सुधारणारी मुंबई आणि महाराष्ट्रातील पहिली मशीन आहे. अत्याधुनिक आणि दुर्मिळ पेटंट सीई मंजूर फेमटोसेकंड लेसर तंत्रज्ञानामुळे अनेक डोळ्यांच्या लेसर शस्त्रक्रिया करण्यात सक्षम आहे. या मोबाईल मशीनच्या सहाय्याने या शहरात किंवा इतर कोणत्याही शहरात असलेल्या कोणत्याही रुग्णालयात रुग्णांवर यशस्वी उपचार करता येणार आहेत. विशेष म्हणजे जगभरातील विविध डोळ्यांच्या आजारांनी ग्रस्त लाखो लोकांना फायदा झाल्याचे केनीया रुग्णालयाचे डॉ. वैशाल केनिया यांनी सांगितले.

झीमर ऑप्थॅल्मिक सिस्टिम्स एजीशी संलग्न केनिया आय हॉस्पिटलने प्रीमियम अत्याधुनिक फेमटोसेकंड लेसर तंत्रज्ञान असलेल्या फेमटो झेड ८ निओ मोबाइल मशीनसह नेत्र उपचार सुरू केले आहेत. आता निओ हा शब्द झीमर ऑप्थॅल्मिक सिस्टीमच्या फेमटोसेकंड लेझर झेड मालिकेत जोडला गेला आहे. फेमटो झेड सुरक्षित असून डोळ्यांच्या उपचारासाठी उपयुक्त आहे, असेही ते म्हणाले.

# संपादकीय

## शहरी भारतासाठी सार्वजनिक वाहतूक व्यवस्था

भारतातील शहरांचा झपाट्याने विस्तार होतो आहे, त्याबरोबरच वाढत जाणारे औद्योगिक क्षेत्र, आर्थिक घडामोडी यांच्यासह रोजगाराच्या वाढत्या विविध संधींना कारणीभूत ठरू शकणारा आहे. भारताच्या जनगणनेनुसार 10 लाख पेक्षा जास्त लोकसंख्या असलेले महानगर क्षेत्र 2001 मधील 35 वरून 2011 मध्ये 53 पर्यंत वाढले आहे. ही प्रवृत्ती सुरू ठेवली आहे, 2011 मध्ये 282 दशलक्ष असलेली शहरी लोकसंख्या 2031 पर्यंत 590 दशलक्षांपर्यंत वाढण्याचा अंदाज आहे. शहरीकरणामुळे प्रवासाच्या संदर्भातील मागण्या वाढलेल्या आहेत. याशिवाय शहरी भागात केलेल्या सहलींची संख्या देखील वाढली आहे. एक अंदाज असे सांगतो की, 2030 पर्यंत वाहतुकीच्या सर्व पद्धतींमध्ये दरडोई सहलीचा दर 0.8-1.55 वरून 1-2 पर्यंत वाढलेला असेल. तरीही शहरी प्रवासातील या वाढीमुळे वाहतूक कोंडी, रस्ते अपघात, पीक-अवर यासह प्रतिकूल वाहतूक बाह्य गोष्टी वाढण्याची शक्यता अधिक आहे. प्रवासाचे अनुभव जास्त लोकसंख्या आणि पर्यावरणाचा ऱ्हास यानिमित्त होण्याचा अंदाज आहे. दिल्ली, मुंबई, कोलकाता आणि चेन्नई या महानगरांना दरवर्षी अंदाजे US$14.7 बिलियन इतका गर्दीचा खर्च येत आहे. 2022 मध्ये राज्ये आणि केंद्रशासित प्रदेशांमध्ये 461,312 रस्ते अपघातांची नोंद झाली आहे, परिणामी 168,491 मृत्यू आणि 443,366 जखमी, रस्ते अपघातात 11.9 टक्के वाढ, मृत्यूमध्ये 9.4 टक्के आणि दुखापतींमध्ये 15.3 टक्के वाढ झाली आहे. शहरांमधील गर्दीच्या वेळी प्रवासाचा वेग 26 ते 17 किमी प्रति तास वरून 8 ते 6 किमी प्रति तास पर्यंत कमी होण्याची शक्यता आहे. वाढत्या वाहतूक कोंडीमुळे शहरांमधील हवेची गुणवत्ता देखील खराब झाली आहे. शहरांमधील गर्दीच्या वेळी प्रवासाचा वेग 26 ते 17 किमी प्रति तास वरून 8 ते 6 किमी प्रति तास पर्यंत कमी होण्याची शक्यता आहे. वाढत्या वाहतूक कोंडीमुळे शहरांमधील हवेची गुणवत्ता देखील खराब झाली आहे. उदाहरणार्थ 2022 मध्ये दिल्ली कोलकाता आणि मुंबईच्या हवेच्या गुणवत्तेचे अनुक्रमे 304, 233 आणि 158 वायू गुणवत्ता निर्देशांक (AQI) मूल्यांसह धोकादायक, अतिशय अस्वस्थ आणि अस्वास्थ्यकर असे वर्गीकरण करण्यात आले आहे. या आव्हानांना तोंड देण्यासाठी शाश्वत मास रॅपिड ट्रान्झिट सिस्टम्स (MRTS) साठी धोरणात्मक नियोजन आवश्यक आहे. या अत्यावश्यकतेला प्रतिसाद देत शहरांनी बस-आधारित पर्यायांपेक्षा त्यांना प्राधान्य देऊन रेल्वे-आधारित सार्वजनिक वाहतूक व्यवस्थेमध्ये गुंतवणूक केली आहे किंवा गुंतवणूक करण्याचा विचार केला आहे. 2005 मध्ये राष्ट्रीय शहरी वाहतूक धोरणाच्या अंमलबजावणीनंतर अनेक भारतीय महानगरांसाठी सार्वजनिक वाहतूक हे केंद्र केंद्रस्थानी बनले. त्यानंतर 12वी पंचवार्षिक योजना, राष्ट्रीय वाहतूक विकास धोरण समिती (NTDPC), शहरी आणि प्रादेशिक विकास योजना तयार करणे आणि अंमलबजावणीचा विचार प्रामुख्याने करण्यात आला. मार्गदर्शक तत्त्वे-2017 (URDPFI), गृहनिर्माण आणि शहरी व्यवहार मंत्रालयाने (MoHUA) विकसित केलेल्या शहरी वाहतूक विकासासाठी मार्गदर्शक तत्त्वे आणि टूलकिट योग्य शहरी सार्वजनिक वाहतूक मोड निवडण्यासाठी मार्गदर्शक तत्त्वे तयार केली आहेत. 2005 मध्ये राष्ट्रीय शहरी वाहतूक धोरण लागू झाल्यानंतर सार्वजनिक वाहतूक हे अनेक भारतीय महानगरांचे केंद्रबिंदू बनले. ही मार्गदर्शक तत्त्वे पीक अवर, पीक डायरेक्शन ट्रॅफिक (PHPDT), लोकसंख्या, घनता आणि प्रवासाची लांबी विचारात घेतात. याव्यतिरिक्त ते प्रत्येक निकषाशी संबंधित थ्रेशोल्ड मूल्ये प्रदान करतात. बस रॅपिड ट्रान्झिट (BRT), लाइट रेल ट्रान्झिट (LRT), किंवा मोनो रेल दिलेल्या शहरासाठी सर्वात योग्य आहे की नाही हे निर्धारित करण्यासाठी आधार म्हणून काम करताना दिसतात. सध्या, 24 भारतीय शहरांमध्ये MRTS आहे आणि 16 शहरांमध्ये मेट्रो रेल्वे किंवा BRT यांचा समावेश असलेली एकच प्रकारची जलद वाहतूक व्यवस्था आहे. उपनगरीय रेल्वे, मेट्रो आणि बीआरटीएसच्या संयोजनासह केवळ पाच शहरांमध्ये दोन किंवा अधिक जलद परिवहन प्रणाली आहेत. रेल्वे-आधारित ट्रान्झिट सिस्टीममध्ये मेट्रो रेल्वे प्रणाली सध्या 16 शहरांमध्ये कार्यरत आहे, सहा शहरांमध्ये बांधकाम सुरू आहे आणि चार शहरांमध्ये मूल्यांकनाच्या टप्प्यावर आहे. वीस शहरे मेट्रो लाईटसाठी व्यवहार्यतेच्या संदर्भातील अभ्यास करत आहेत. तर तीन शहरे मेट्रो निओच्या व्यवहार्यतेचा एकाचवेळी शोध घेत आहेत. तथापि, या संदर्भातील डेटा असे दर्शवितो की प्रवासी संख्या कोणत्याही भारतीय शहरातील कार्यरत मेट्रो रेल्वे प्रणालींच्या कॅरेज क्षमतेशी सुसंगत नाही. मेट्रो रेल्वे प्रणालींनी त्यांच्या तपशीलवार प्रकल्प अहवालात (डीपीआर) रायडरशिपचा अंदाज पूर्ण केलेला नाही. मुंबई (फेज 1) ने आपल्या अंदाजे रायडरशिपच्या 89 टक्के गाठले आहे. तर चेन्नई आणि हैदराबादने अनुक्रमे 35 टक्के आणि 26 टक्के गाठले आहे. शिवाय, उर्वरित 13 शहरांनी अंदाजे रायडरशिपच्या 20 टक्के देखील गाठण्यासाठी संघर्ष केला आहे. याउलट, लेखकाने नऊ शहरांमध्ये केलेल्या बस-आधारित ट्रान्झिट सिस्टमसाठी रायडरशीप डेटाचे विश्लेषण लक्षणीय असमानता दाखविणारे आहे. बहुतेक शहरांमध्ये मेट्रो रेल्वेच्या रायडरशिपपेक्षा जास्त बस प्रवासी संख्या दिसून येते. या शहरांमध्ये रेल्वे-आधारित संक्रमण प्रणालींपेक्षा प्रवासी सार्वजनिक बसचा वापर 0.9 ते 19.7 पट जास्त करतात-सर्व शहरांमध्ये बस फ्लीटची कमतरता असूनही. रेल्वे आधारित ट्रान्झिट सिस्टीममध्ये मेट्रो रेल सिस्टीम सध्या 16 शहरांमध्ये कार्यरत आहेत, सहा शहरांमध्ये बांधकाम सुरू आहे आणि चार शहरांमध्ये मूल्यांकन टप्प्यात आहे. बहुतेक भारतीय शहरे देखील प्रति लाख लोकसंख्येच्या 40-60 बसेसच्या किमान ताफ्याच्या आकाराच्या MoHUA मार्गदर्शक तत्त्वांचे पालन करत नाहीत. प्रत्येक लाख लोकसंख्येमागे बसची संख्या शहरांमध्ये बदलत जाते. लखनौमधील सहा ते बंगळुरूमध्ये जास्तीत जास्त 45 पर्यंत ही संख्या असून इतर सर्व शहरे या स्पेक्ट्रममध्ये येतात. अपूर्ण बस फ्लीट असूनही बस-आधारित ट्रान्झिट सिस्टीमची उच्च रायडर्सशिप आणि मेट्रो रेल्वे सिस्टिमची कमी प्रवासी संख्या, भारतीय शहरांच्या सध्याच्या वाहतुकीच्या पद्धती, विशेषत: बसेस वाढविण्याऐवजी मेगा रेल्वे-आधारित प्रकल्पांच्या बांधकामावर जास्त भर दिल्याचे अधोरेखित करते. यामुळे अशी परिस्थिती निर्माण झाली आहे की शहरांमधील सार्वजनिक वाहतुकीचे सर्व मार्ग एकमेकांना पूरक होण्याऐवजी एकमेकांशी स्पर्धा करताना दिसतात. ज्यामुळे सार्वजनिक वाहतुकीच्या सर्व पद्धतींचे अखंडित आणि टिकाऊ ऑपरेशन होते. भारतीय शहरे शाश्वत शहरी सार्वजनिक वाहतूक कशी साध्य करतात हे जगातील पहिल्या तीन अर्थव्यवस्थांमध्ये स्थान मिळवण्याच्या क्षमतेसाठी निर्णायक ठरणारे आहे. अनेक शहरांनी बस फ्लीट आणि नेटवर्क वाढविण्यावर लक्ष केंद्रित न करता किंवा अधिक महागड्या रेल्वे-आधारित पर्यायाच्या गरजेचे मूल्यमापन न करता त्यांच्या शहरी वाहतूक समस्यांवर रामबाण उपाय म्हणून मेट्रो रेल्वेचा स्वीकार करण्यासाठी महत्त्वपूर्ण पावले उचललेली आहेत. मेट्रो रेल्वेची गरज नाही, असे म्हणता येणार नाही. देशातील अनेक टियर 2 शहरांमध्ये लोकसंख्येची वाढ सातत्याने होत आहे. त्यांना मेट्रो रेल्वेची आवश्यकता असेल - परंतु जेव्हा त्यांची बस-आधारित प्रणाली उपयुक्ततेची ठरणार नाही तेव्हाच. शहरी वाहतूक व्यवस्थेतील गुंतवणुकीची वेळ आणि प्रमाण याविषयीच्या सु-परिभाषित नियमांच्या अभावामुळे सध्याच्या पद्धती वाढवणे आणि सुव्यवस्थित न करता अनेक लहान शहरांना अयोग्य सार्वजनिक वाहतूक पर्यायांसाठी अवाजवी वित्तपुरवठा करण्यास प्रवृत्त केले आहे.

# महाराष्ट्राला संरक्षण उत्पादनाचे प्रमुख केंद्र बनवणारा 'डिफेन्स एक्स्पो'

एक वेळ अशी होती की, अमेरिकेच्या दबावापुढे झुकलेल्या रशियाने भारताला क्रायोजेनिक इंजिन प्रणाली देण्यास नकार दिला. प्रक्षेपण यानामध्ये असणारे हे इंजिन म्हणजे अतिवजनाच्या उपग्रहांना अंतरिक्षात पोहचवणारी अश्वशक्ती क्षमता आहे. आपल्या पीएसएलव्ही म्हणजेच भूउपग्रह प्रक्षेपण यानाचे यश याच इंजिनावर अवलंबून आहे. रशियाच्या नकारानंतर आपल्या वैज्ञानिकांनी दूरदृष्टी दाखवत स्वदेशी तंत्रज्ञानाचा वापर करून काही वर्षातच क्रायोजेनिक इंजिन तयार केले. तेव्हापासून भारतीय वैज्ञानिकांनी इतर देशांसमोर हात पसरण्यापेक्षा वेळोवेळी आव्हाने स्वीकारत देशी बनावटीचे तंत्रज्ञान विकसित करत अंतराळ संशोधनात आज पहिल्या पाच देशांमध्ये आपले स्थान पक्के केले आहे.




हीच स्थिती संरक्षण शस्त्रास्त्रे व साहित्य खरेदीबाबतही होती. अमेरिका शस्त्रास्त्रे निर्मिती करण्यात आणि विकण्यातही अग्रेसर आहे. याचप्रमाणे, रशिया, फ्रांस, इस्त्राईल, उत्तर व दक्षिण कोरिया हे देशही यात आघाडीवर आहेत. पण आज भारत अनेक शस्त्रास्त्रे स्वदेशी बनावटीची वापरतो. स्वदेशी तंत्रज्ञान ही संकल्पना संरक्षण क्षेत्रात आणल्यानंतर मोठ्या प्रमाणात संरक्षण उत्पादने तयार करणा-या एमएसएमई देशात तयार झाल्या आहेत. आज देशात मोठ्या प्रमाणात संरक्षण साहित्य निर्माण होत आहे. यात महाराष्ट्र आघाडीवर असून राज्यात १० ऑर्डिनन्स फॅक्टरी आणि ५ डिफेन्स पी एस यू आहेत. टाटा, भारत फोर्ज, सोलार, एल ॲण्ड टी, महिंद्रा, निबे अशा मोठ्या कंपन्या राज्यात संरक्षण क्षेत्रात नाविन्यपूर्ण उपादने तयार करीत आहेत.

भारताच्या संरक्षण उत्पादन क्षेत्रात आत्मनिर्भर भारताच्या वाटचालीला आणखी बळकटी देण्यासाठी राज्य शासनाच्या उद्योग विभागामार्फत महाराष्ट्रातील संरक्षण साहित्य उत्पादन करणा-या सूक्ष्म, लघु व मध्यम उद्योग क्षेत्राला चालना देण्याच्या उद्देशाने २४ ते २६ फेब्रुवारी २०२४ दरम्यान 'महाराष्ट्र एमएसएमई डिफेन्स एक्स्पोचे' आयोजन करण्यात आले आहे. पुण्यातील मोशी येथे आंतरराष्ट्रीय प्रदर्शन आणि कन्व्हेन्शन सेंटर येथे हा एक्स्पो होत आहे. विशेष म्हणजे संरक्षण उत्पादन क्षेत्रात महत्त्वपूर्ण योगदान देण्यासाठी राज्यातील सूक्ष्म, लघु आणि मध्यम उद्योगांना (MSMEs) सक्षम करणारा महाराष्ट्रातील या प्रकारातील हा पहिलाच डिफेन्स एक्स्पो आहे. संरक्षण उत्पादन क्षेत्रातील अत्याधुनिक तंत्रज्ञान आणि प्राविण्य असणाऱ्या उद्योगातील समन्वयाला चालना देण्याच्या उद्देशाने वायुसेना, नौसेना आणि स्थलसेना या तीनही सुरक्षा दलांचा यात महत्वाचा सहभाग असणार आहे. या एक्स्पोमध्ये १ हजारहून अधिक सूक्ष्म, लघु व मध्यम उद्योग, स्टार्ट-अप आणि २०,००० हुन अधिक अभियांत्रिकी विद्यार्थी एकत्र येऊन ज्ञान आणि तंत्रज्ञानाची देवाणघेवाण करतील. यात एल ॲण्ड टी, महिंद्रा, टाटा, डीआरडीओ आणि संरक्षण क्षेत्रातील सार्वजनिक क्षेत्रातील कंपन्या -पीएसयु (PSUs) यासह विविध प्रतिष्ठित उद्योगातील तज्ज्ञ असतील. हा एक्स्पो महाराष्ट्राला संरक्षण उत्पादनाचे प्रमुख केंद्र म्हणून निश्चितच पुढे नेणारा ठरणार आहे.

भारताच्या संरक्षण क्षेत्रात महाराष्ट्राची भूमिका

भारताच्या संरक्षण क्षेत्रात महाराष्ट्राची भूमिका अतिशय महत्वाची आहे. याचे प्रमुख कारण म्हणजे देशाच्या ४० पैकी १० संरक्षण उत्पादन आणि आयुध निर्माण करणारे कारखाने महाराष्ट्रात आहेत. राज्याची राजधानी – मुंबई, ही भारतीय नौदलाच्या पश्चिम कमांडचे मुख्यालय आहे. भारतीय नौदलाचे जनक छत्रपती शिवाजी महाराज यांची भूमी असलेले पुणे, भारतीय लष्कराच्या दक्षिणी कमांडचे मुख्यालय आहे. राष्ट्रीय संरक्षण प्रबोधिनीचेही (NDA) मुख्यालय आणि संरक्षण संशोधन आणि विकास संस्था (DRDO) सुद्धा याच जिल्ह्यात महत्त्वाची भूमिका बजावते. पुण्याचे महत्त्व अधोरेखित करणारे सशस्त्र सेना वैद्यकीय महाविद्यालय आणि मुनिशन इंडिया लिमिटेडचे मुख्यालय सुद्धा पुण्यात आहे. भारतीय लष्कराचे आर्मर्ड कॉर्प्स स्कूल आणि सेंटर (ACS&C) हे महाराष्ट्रातील अहमदनगर जिल्ह्यात पुण्यापासून सुमारे 120 किलोमीटर अंतरावर आहे. लष्कराशी संबंधित एवढ्या मोठ्या यंत्रणा एकाच राज्यात असणारे महाराष्ट्र हे एकमेव राज्य आहे.

एक्स्पोची मुख्य उद्दिष्टे

सूक्ष्म, लघु व मध्यम उद्योग( MSME) डिफेन्स एक्स्पो हे एक अभूतपूर्व प्रदर्शन असणार आहे. या क्षेत्रातील नवकल्पना आणि उद्योजकतेला प्रोत्साहन देण्यासोबतच संरक्षण क्षेत्रातील प्रमुख खरेदीदार म्हणजे तीनही सैन्य दल आणि विक्रेता यांच्यातील संपर्क वाढवणे, महाराष्ट्रातील डिफेन्स एमएसएमईची तयार झालेली इकोसिस्टम अधिक बळकट करण्यासोबतच संरक्षण क्षेत्रातील खरेदीदारांसाठी अर्थपूर्ण संवाद निर्माण करणे, यासोबतच व्यवसायाच्या परस्पर फायदेशीर संधी ओळखण्यासाठी 'डायनॅमिक फोरमची' स्थापना करणे, संरक्षण उत्पादन क्षेत्रात नावीन्यपूर्ण उद्योजकतेची संस्कृती जोपासणे, अत्याधुनिक उपायांच्या विकासास प्रेरणा व प्रोत्साहन देणे, धोरणात्मक उपक्रम राबवून शाश्वत आणि मजबूत वाढीसाठी आवश्यक सहाय्य प्रदान करून महाराष्ट्रातील एमएसएमई क्षेत्राच्या विस्तारासाठी सक्रियपणे योगदान देणे, महत्त्वाच्या क्षेत्रातील एमएसएमईसाठी अनुकूल संधी निर्माण करून खरेदीदार आणि विक्रेते यांच्यातील संपर्क मजबूत करणे हे या एक्स्पोमागील महत्त्वाचे उद्देश आहेत.

तसेच महाराष्ट्रात डायनॅमिक एमएसएमई जाळ्यासाठी एक मजबूत आणि टिकाऊ पुरवठा साखळी फाउंडेशनची स्थापना करणे, संरक्षण उत्पादन आणि निर्यातीसाठी मार्ग मोकळा करणे, शैक्षणिक-उद्योग सहकार्याच्या प्रगतीद्वारे राज्य आणि राष्ट्रासाठी एक शक्तिशाली परिसंस्था उत्प्रेरित करणे हा सुद्धा या प्रदर्शनाचा उद्देश आहे.

महाराष्ट्राचे सक्षमीकरण: एमएसएमई, संरक्षण आणि तंत्रज्ञान

महाराष्ट्रातील स्टार्ट-अप कंपन्यांद्वारे तयार केले जाणारे काही भविष्यकालीन स्वदेशी तंत्रज्ञान हे संरक्षण तंत्रज्ञान क्रांतीचे पुढचे पाऊल ठरणार आहे. त्यामुळे राज्य या क्षेत्रात निश्चितच आघाडी घेईल यात शंका नाही. यातील महत्वाच्या बाबी अशा आहेत.

हवाई देखरेखीसाठी ड्रोन- पुरवठा आणि ड्रॉप डाऊनची क्षमता असलेले हे पहिले आणि एकमेव मानव-पोर्टेबल स्वायत्त ड्रोन आहे.

व्हिजन प्रोसेसिंग सिस्टीम उत्पादन- रणांगणाचे रिअल-टाइम चित्रण दाखवते. प्रगत इमेजिंग आणि सेन्सर तंत्रज्ञान एकत्र करते; यात दिवस आणि रात्रीचे चित्रण दाखवण्याची क्षमता आहे.

जैव-पॉलिमर प्लॅटफॉर्म – जखमेच्या काळजीसाठी आधारित उत्पादने- हे बायोएक्टिव्ह मायक्रोफायबर जेलिंग तंत्रज्ञानावर आधारित हेमोस्टॅटिक मलमपट्टी करते.

रोबोटिक सोल्यूशन्स- एकत्रित कार्यरत प्रणाली (युनिफाइड ऑपरेटिंग सिस्टीम) अनेक क्षेत्रांमध्ये जोडलेले रोबोट्स व्यवस्थापित करण्यात मदत करते.

दृष्य पाळत प्रणाली- हे संरक्षण आणि एरोस्पेस संस्थांसाठी उच्च-स्तरीय इलेक्ट्रो-ऑप्टिक पाळत ठेवणारी प्रणाली आहे.

लढाऊ शस्त्र प्रणाली – या टाक्या इंजिनसह मागील चाकांना शक्ती पुरवणारा मोटारीच्या यंत्राचा भाग, लढाऊ चिलखत, युद्ध भूमीवर ॲण्टीड्रोन संरक्षण प्रणालीसह एकत्रीकरणासाठी तयार केल्या आहेत.

अशा नाविन्यपूर्ण तंत्रज्ञानासह महाराष्ट्र या एक्स्पोमध्ये आपली क्षमता सिद्ध करेल. त्याचबरोबर या प्रदर्शनात अभियांत्रिकीच्या विद्यार्थ्यांशी प्रत्येक सत्रात होणारा संवाद विद्यार्थ्यांच्या भविष्यातील कारकिर्दीला वेगळा आयाम आणि प्रेरणा देणारा ठरेल. कोण जाणे यातूनच भविष्यात काही नाविन्यपूर्ण स्टार्ट अप्स सुरु होतील.

**मनीषा सावळे,**
**विभागीय संपर्क अधिकारी**
**माहिती व जनसंपर्क महासंचालनालय,**
**मंत्रालय, मुंबई-32.**

# अक्षय्य उर्जा खरेदी करण्याबद्दलचे असलेले निर्बंध आणि निर्बंध न पाळणारी राज्ये

विद्युत कायदा २०२३ (ई. ए. २०२३) ने अनिवार्य केलेल्या राज्य विद्युत नियामक आयोगांनी (एस. ई. आर. सी.) अक्षय्य ऊर्जा (आर. ई.) स्त्रोतांकडून काही टक्के वीज खरेदी करण्यासाठी वितरण कंपन्यांवर (डिस्कॉम्स) अक्षय्य उर्जा खरेदी करण्याचे निर्बंध लादले. जानेवारी २०१६ मध्ये वीज दर धोरणात सुधारणा केल्यानंतर, एस. ई. आर. सी. ला मार्च २०२२ पर्यंत किंवा केंद्र सरकारने अधिसूचित केल्याप्रमाणे एकूण ऊर्जेच्या वापराच्या (जलविद्युत वगळता) ८ टक्क्यांपर्यंत पोहोचण्यासाठी सौर ऊर्जेच्या खरेदीसाठी किमान टक्केवारी राखून ठेवणे आवश्यक होते. जुलै २०१८ मध्ये केंद्र सरकारने सर्व राज्ये आणि केंद्रशासित प्रदेशांसाठी सौर तसेच बिगर-सौर आरईसाठी आरपीओच्या दीर्घकालीन वाढीचा मार्ग अधिसूचित केला,२०२२ पर्यंत आरपीओच्या २१ टक्क्यांपर्यंत पोहोचून सौर-आधारित विजेसाठी १०.५ टक्के. २२ जुलै २०२२ रोजीच्या एमओपी आदेशानुसार २०२१-२२ नंतर केंद्र सरकारने अनिवार्य केलेला अक्षय्य उर्जेचा वाटा २०३० पर्यंत एकूण ऊर्जा वापराच्या ४३ टक्क्यांपर्यंत पोहोचण्याची अपेक्षा आहे. २०२२-२३ साठी जलविद्युत खरेदीचे दायित्व (HPO) सह केंद्र सरकारने अनिवार्य केलेले एकूण RPO लक्ष्य २४.६१ टक्के आहे. राज्य सरकारची अक्षय्य उर्जेचे उद्दिष्टे किमान ३० टक्क्यांनी कमी आहेत.



अनुपालन

केंद्रीय अक्षय्य उर्जेच्या उद्दिष्टांच्या अनुपालनाबाबत, "जलविद्युत-समृद्ध" राज्यांना "अक्षय्य उर्जा -समृद्ध" राज्यांपेक्षा चांगले गुण मिळतात. २०२२-२३ मध्ये, सिक्कीम ८८.४ टक्के आरपीओ अनुपालनासह क्रमवारीत आघाडीवर आहे, त्यानंतर हिमाचल प्रदेश ७८.२ टक्के आणि उत्तराखंड ६०.४ टक्के आहे. अक्षय्य ऊर्जेने समृद्ध राज्यांमध्ये कर्नाटकमध्ये सर्वाधिक ४६.७ टक्के, त्यानंतर केरळमध्ये ३६.३ टक्के आणि आंध्र प्रदेशात २८.५ टक्के अनुपालन होते. वितरण कंपन्यांद्वारे अक्षय्य उर्जा स्वीकारण्यासाठी खराब अक्षय्य उर्जेचे निर्बंधांचे अनुपालन आणि अंमलबजावणी ही प्रमुख आव्हाने आहेत.

अक्षय्य (Renewable) ऊर्जा परवाना प्रमाणपत्रे

व्यापार करण्यायोग्य बाजार-आधारित साधन असलेल्या अक्षय्य ऊर्जा प्रमाणपत्रांद्वारे (आर. ई. सी.) आर. पी. ओ. ची प्रशंसा केली जाते. आर. ई. सी. मूळतः आर. पी. ओ. आदेशांचे पालन सुलभ करण्यासाठी आणि कमी कार्बन वीज निर्मितीसाठी पर्यायी मूल्यांकनासाठी एक मार्ग म्हणून काम करण्यासाठी तयार करण्यात आले होते. वितरण कंपन्या, स्पर्धकांना मुक्त प्रवेश आणि कॅप्टिव्ह वीज प्रकल्पांकडे त्यांच्या आरपीओची पूर्तता करण्यासाठी आरईसी खरेदी करण्याचा पर्याय होता. आर. ई. सी. चे मूल्य हे आर. ई. स्त्रोतांकडून ग्रीडमध्ये इंजेक्ट केलेल्या 1 Megawatt Hour (मेगावॅट तास) विजेच्या समतुल्य आहे. राजस्थान, महाराष्ट्र आणि तामिळनाडू यासारखी राज्ये, ज्यांच्याकडे उच्च आरई संसाधन देणगी आहे, एसईआरसीद्वारे निश्चित केलेल्या आरपीओ उद्दिष्टांच्या पलीकडे आरई-आधारित वीज निर्मिती करतात. तथापि, कमी आरई क्षमता असलेली दिल्ली, पश्चिम बंगाल आणि बिहारसारखी राज्ये आरई-आधारित वीज निर्माण करतात जी त्यांच्या आरपीओ लक्ष्यापेक्षा खूपच कमी आहे. ही विसंगती दूर करण्यासाठी आर. ई. सी. ची रचना करण्यात आली होती. आरई जनरेटर एकतर सी. ई. आर. सी. ने निश्चित केलेल्या प्राधान्याच्या दराने आरई-आधारित वीज थेट विकतात किंवा आर. ई. सी. च्या स्वरूपात विकतात.

आरईसी यंत्रणेच्या स्थापनेपासून, ५३ टक्क्यांहून अधिक आरईसी डिस्कॉम्सने आणि ४५ टक्क्यांहून अधिक कॅप्टिव्ह पॉवर प्रोड्युसर्स (सी. पी. पी.) आणि ओपन एक्सेस (ओ. ए.) ग्राहकांनी खरेदी केले आहेत. डिस्कॉम्सने त्यांच्या आर. पी. ओ. ची भरपाई करण्यासाठी ३६ दशलक्षाहून अधिक आर. ई. सी. खरेदी केल्या आहेत आणि ओ. ए. ग्राहक आणि सी. पी. पी. यांनी ३१ दशलक्षाहून अधिक आर. ई. सी. खरेदी केल्या आहेत. मार्च २०२२ पर्यंत, आरईसी यंत्रणेअंतर्गत १०४३ आरई प्रकल्प (४.५ जीडब्ल्यू क्षमतेसह) आणि ४ डिस्कॉम्सची नोंदणी करण्यात आली होती. आर. ई. सी. अंतर्गत नोंदणीकृत क्षमतेपैकी ५६ टक्क्यांहून अधिक क्षमता पवनऊर्जा उत्पादकांच्या मालकीची आहे आणि २२ टक्क्यांहून अधिक क्षमता सौरऊर्जा प्रकल्पांमध्ये नोंदणीकृत आहे. तामिळनाडू राज्यात आरईसी अंतर्गत नोंदणीकृत सर्वाधिक क्षमता (१.२ गिगावॅटपेक्षा जास्त) आहे.

आर. ई. सी. बाजार अपेक्षांवर खरा उतरला नाही, केवळ काही राज्यांनी आर. ई. किंवा आर. ई. सी. च्या खरेदीद्वारे त्यांचे आर. पी. ओ. पूर्ण केले. डिस्कॉम्सद्वारे अक्षय्य उर्जा स्वीकारण्यास प्रोत्साहन देण्यात आरईसी यंत्रणेचे अपयश आरपीओ आदेशांचे दीर्घकालीन पालन न करणे प्रतिबिंबित करते. आरईसी प्रमाणपत्र दर २०१४-१५ मध्ये त्यांच्या शिखरावरून घसरले आहेत आणि २०२३ मध्ये न विकल्या गेलेल्या इन्व्हेंटरी १९ दशलक्षाहून अधिक वाढल्या आहेत. २०२२ पर्यंत आर. ई. सी. ची देवाणघेवाण केवळ सी. ई. आर. सी. ने मंजूर केलेल्या वीज विनिमय केंद्रांमध्ये किमान किंमत आणि सी. ई. आर. सी. ने निर्धारित केलेल्या मर्यादा (कमाल मर्यादा) किंमतीच्या श्रेणीत केली जात होती. २०१०-१२ पासून सौर आरईसीची कमाल किंमत ९० टक्क्यांहून अधिक आणि गैर-सौर आरईसीची किंमत ३० टक्क्यांहून अधिक घसरली आहे. डिसेंबर २०२३ पर्यंत एकूण आरई क्षमतेच्या केवळ ५ टक्के आरईसी मान्यताप्राप्त आहेत. आर. ई. प्रकार खरेदी करण्याचे स्वातंत्र्य जे विशिष्ट डिस्कॉमच्या लोड प्रोफाइलशी सर्वात चांगले जुळते, ते आर. पी. ओ. लक्ष्यांच्या बाबतीत अधिक चांगली कामगिरी करू शकते.

फ्लोटिंग सोलर, ऑफशोअर विंड, ग्रीन हायड्रोजन आणि ऊर्जा साठवण यासारख्या तंत्रज्ञानाचा आरपीओ अंतर्गत समावेश नाही. सौरऊर्जेच्या किंमती १० रुपये प्रती युनिट पेक्षा जास्त असताना स्वतंत्र सौर आर. पी. ओ. अनिवार्य करण्यात आला होता आणि अनिवार्य नसता तर कोणत्याही वितरकाने तो खरेदी केला नसता. आता आरई स्त्रोतांमध्ये सौर हा सर्वात स्वस्त निर्मिती स्रोत आहे. सौर आणि बिगर-सौर आर. पी. ओ. विलीन करणे हा एक पर्याय आहे ज्याला डिस्कॉम्स प्राधान्य देण्याची शक्यता आहे. महाराष्ट्र विद्युत नियामक आयोगाने (एम. ई. आर. सी.) अनुपालन न केल्यास जास्त दंड आकारला आहे आणि आर. पी. ओ. च्या आदेशांचे अति-पालन केल्यास प्रोत्साहन दिले आहे. यामध्ये वितरण परवानाधारकांच्या वार्षिक महसूल आवश्यकतेमध्ये (ए. आर. आर.) ०.१० पैसे प्रती युनिट च्या दराने कपात करणे समाविष्ट आहे. त्याच वेळी, एमईआरसी २०२१-२२ पर्यंत केंद्र सरकारने अधिसूचित केलेल्या वार्षिक टक्केवारीपर्यंत एमईआरसीद्वारे निर्दिष्ट आरपीओ लक्ष्याच्या वर आणि त्याहून अधिक खरेदी केलेल्या अतिरिक्त आरई पॉवरला ०.२५ पैसे प्रती युनिट प्रोत्साहन देते.

डिसेंबरमध्ये अंमलात आलेल्या २०२२ मधील आर. ई. सी. नियमांचा उद्देश आर. ई. सी. यंत्रणेची पुनर्रचना करणे हा होता. नवीन नियमांनी तंत्रज्ञानाद्वारे आर. ई. सी. गुणकांची संकल्पना सादर केली, विक्री होईपर्यंत आर. ई. सी. ची वैधता कायमस्वरूपी वाढवली आणि सर्वात महत्त्वाचे म्हणजे, आर. ई. सी. व्यापारासाठी पद्धती आणि कमाल मर्यादा किंमत काढून टाकली. नवीन नियम राज्य आणि केंद्रीय स्तरावरील तंत्रज्ञान आणि धोरणांबाबत आर. ई. सी. यंत्रणेशी संबंधित अनिश्चितता आणि जोखीम वाढवू शकतात.

समस्या

राज्य आणि केंद्रीय स्तरावरील उच्च बाजारपेठ आणि नियामक अनिश्चिततेमुळे आर. ई. सी. बाजारपेठ मर्यादित राहण्याची शक्यता आहे. आर. ई. सी. बाजारपेठेचे संभाव्य शोषण करू शकणाऱ्या कार्बन बाजाराची नियोजित ओळख आणि इतर उत्सर्जन कमी करण्याच्या उपाययोजनांमधील स्पर्धा यामुळे अनिश्चितता वाढते. स्पर्धात्मक बोली, ग्रीन टर्म फॉरवर्ड मार्केट (जीटीएएम) आणि इंटिग्रेटेड डे-फॉरवर्ड मार्केट (किंवा ग्रीन डे फॉरवर्ड मार्केट किंवा जीडीएएम) यासारख्या साधनांद्वारे आणि शुल्क माफ करणाऱ्या आंतरराज्य पारेषण प्रणालीद्वारे (आयएसटीएस) आता आरपीओ अनुपालनासाठी आरईसीशी स्पर्धा करतात. विजेमध्ये स्पर्धा सुरू झाल्यास तर आर. ई. सी. यंत्रणेपेक्षा अधिक पारदर्शकता आणि अंदाज लावण्याची क्षमता असलेल्या नवीन यंत्रणांना डिस्कॉम्स प्राधान्य देण्याची शक्यता आहे.

# कला आणि संस्कृतीच्या क्षेत्रातील समस्या सोडवण्यासाठी समिती नियुक्त करणार- मुख्यमंत्री

## महाबळेश्वरमध्ये विभागीय नाट्य संमेलनाचे मुख्यमंत्र्यांच्या हस्ते उद्घाटन

प्रतिनिधी
सातारा

महाराष्ट्राला कला आणि संस्कृतीचा अत्यंत गौरवशाली वारसा लाभला आहे. कला आणि संस्कृतीशी संबंधित समस्या सोडवण्यासाठी शासन कटिबद्ध आहे. नाट्य संस्कृतीला अधिक बळकट करण्यासाठी राज्यात 75 नाट्यगृहे अद्ययावत करण्यात येणार आहेत. यामध्ये 52 नाट्यगृहांचे अद्ययावतीकरण करण्यात येणार असून उर्वरित नाट्यगृहे नव्याने उभारण्यात येणार आहेत . ती सर्व सुविधा संपन्न असावीत व परिपूर्ण असावी यासाठी अकरा तज्ञांची समिती स्थापन करण्यात येणार आहे, अशी ग्वाही मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी दिली. रंगभूमी मध्यवर्ती संघटना अखिल भारतीय मराठी नाट्य परिषदचे शंभरावे विभागीय नाट्य संमेलन महाबळेश्वर




येथे छत्रपती शिवाजी महाराज नाट्य नगरी या ठिकाणी संपन्न होत आहे. या नाट्य संमेलनाचे उद्घाटन मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या हस्ते झाले. यावेळी राज्य उत्पादन शुल्क मंत्री तथा पालकमंत्री शंभूराजे देसाई, आमदार मकरंद पाटील , संमेलन अध्यक्ष जब्बार पटेल, माजी संमेलन अध्यक्ष मोहन जोशी, नाट्य परिषदेचे अध्यक्ष प्रशांत दामले, जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी, अप्पर पोलीस अधीक्षक आंचल दलाल यांच्यासह विविध मान्यवर उपस्थित होते.

अनेक थोर कलाकारांच्या योगदानातून मराठी रंगभूमी बहरली. नाट्य रसिकांच्या पसंतीस उतरण्यासाठी काळानुरूप रंगभूमीने अनेक बदल स्वीकारले. त्यामुळेच व्यावसायिक सोबत प्रायोगिक रंगभूमीलाही चोखंदळ रसिकांचा उदंड प्रतिसाद लाभला आहे.

अनेक अडचणींवर मात करत सध्या मराठी रंगभूमी पुढे जात आहे. अशावेळी नाट्यसंमेलनांसारखे उपक्रम महत्त्वपूर्ण ठरतात, असे सांगून मुख्यमंत्री एकनाथ शिंदे म्हणाले, अशा नाट्यसंमेलनांमधून नवकलाकार उदयास आणण्याचे महत्त्वपूर्ण कार्य घडते. यातूनच स्थानिक कलाकारांना मंच उपलब्ध होतो. महाबळेश्वर येथे होत असलेल्या विभागीय नाट्यसंमेलनाप्रमाणेच राज्याच्या विविध जिल्ह्यांमध्ये नाट्य संमेलने होत आहेत. यातून गौरवशाली नाट्य संस्कृतीचा विस्तार दिग्गज कलाकार करत आहेत. नाट्यकलेमध्ये कार्य करणारे कलाकार हे सेवाभाव घेऊन नाट्य संस्कृती जोपासत असतात. कलेला जेंव्हा रसिक दाद देतात तेव्हांच कलाकार कला समृद्ध करू शकतो. यावेळी त्यांनी जेष्ठ कलाकार अशोक सराफ यांना महाराष्ट्र भूषण देऊन महाराष्ट्र शासनाने गौरव केल्याचेही सांगितले. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे म्हणाले, महाबळेश्वर येथे दोन हजार प्रेक्षक क्षमतेचे नाट्यगृह असून ते सध्या बंद स्थितीत आहे. हे नाट्यगृह पुन्हा सुरू करण्यासाठी जिल्हा वार्षिक योजनेतून निधी देण्याची सूचनाही त्यांनी केली. मुंबई येथील फिल्म सिटी बाबत बोलताना मुख्यमंत्री म्हणाले, ही फिल्म सिटी आंतरराष्ट्रीय दर्जाची करण्यात येणार आहे. मराठी भाषा व नाट्य चळवळ यांना बळ देण्यासाठी शासन नेहमीच सकारात्मक असल्याची ग्वाही त्यांनी यावेळी दिली.

### मुख्यमंत्र्यांनी वाढदिवसानिमित्त घेतली उदयनराजेंची भेट



*सातारा : मराठा समाजाला दिलेले आरक्षण टिकणार नाही असे सातत्याने बोलले जात आहे. परंतु त्याची कारणं कोणी सांगत नाहीत. ते टिकावे यासाठी सकारात्मक चर्चा झाली पाहिजे. त्यावेळी ज्यांना संधी होती तेव्हा त्यांनी त्याचे सोनं केले नाही. आम्ही कोणत्याही समाजावर अन्याय होणार नाही याची दखल घेऊन मराठा आरक्षण दिले आहे असे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी सातारा येथे खासदार उदयनराजे भोसले यांची भेट घेतल्यानंतर स्पष्ट केले. खासदार उदयनराजे भोसले यांच्या वाढदिवसानिमित्त राजेंना शुभेच्छा देण्यासाठी आज (शनिवार) मुख्यमंत्री एकनाथ शिंदे हे सातारा येथील उदयनराजे यांच्या जलमंदिर पॅलेस येथे आले होते. त्यांच्या समवेत पालकमंत्री शंभूराज देसाई, आमदार महेश शिंदे आदी होते. सगेसोयरे या शब्दाला ग्राह्य धरूनच मराठा समाजाला सरसकट आरक्षण देण्यात यावे, यासाठी मनोज जरांगे-पाटील यांनी अंतरवालीत पुन्हा उपोषण सुरू केले.*

## म ह त्त्वा चे

### महामार्गावरील अपघातात उस तोडणारे कामगार जखमी

**सोलापूर :** टेभुर्णी- अहमदनगर महामार्गावर मांगी स्टँडवर एसटी बस व दुचाकीचा अपघात झाला. यामध्ये दुचाकीवरील उत्तर वडगाव येथील तिघे ऊसतोड कामगार जखमी झाले आहेत. जखमी महिलेला सोलापूर येथील सिव्हील रुग्णालयात दाखल केले आहे. तर एका चिमुकल्याला करमाळ्यात खासगी रुग्णालयात व एकावर करमाळा उपजिल्हा रुग्णालयात उपचार सुरु आहेत. या रस्त्यावर शुक्रवारी ट्रकचा अपघात झाला होता. त्यानंतर आज पुन्हा हा अपघात झाला आहे. जखमींमध्ये कामगारांच्या लहान मुलांचा समावेश आहे. सोलापूर येथून नाशिकला एसटी बस जात होती. तर अपघातातील जखमी हे दुचाकीवरून पोथरेकडे ऊसतोडणीसाठी जात होते. सोनाली पांडुरंग शिंदे (वय ३२), पांडुरंग बबन शिंदे (वय ३२) व गजानन पांडुरंग शिंदे (वय १२) अशी यातील जखमींची नावे आहेत.

### पुणेकरांवर पाणी कपातीची टांगती तलवार



**पुणे :** पुणे शहरावरील पाणी कपातीचे संकट टळले आहे. आज उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या उपस्थितीत झालेल्या कालवा समितीच्या बैठकीत यासंबंधीचा महत्वाचा निर्णय घेण्यात आला आहे. तसेच पुणे जिल्ह्यात शेतीलाही पाणी मिळणार असल्याचा निर्णय या बैठकीत घेण्यात आला आहे. याबाबत अधिक माहिती अशी की, पुणे शहराला पाणीपुरवठा करणाऱ्या खडकवासला धरण साखळी क्षेत्रात केवळ 55 टक्के इतकाच पाणीसाठा उरल्याने पुणेकरांवर पाणी कपातीची टांगती तलवार होती. यासंबंधी आज उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या अध्यक्षतेखा कालवा समितीची महत्वाची बैठक पुण्यात पार पडली.या बैठकीत पाणी कपातीसंबंधी महत्वाचा निर्णय घेण्यात आला आहे. पंचवीस वर्षातील सर्वात कमी पाऊस यावेळी पुणे जिल्ह्यात धरण क्षेत्रात झाला होता. मात्र तरीही यावेळी पुणेकरांना पाणी कपातीला सामोरे जावे लागणार नाही.तसेच शेतीसाठी ७ टीएमसी पाणी सोडले जाणार असल्याचेही या बैठकीत जाहीर करण्यात आले. उन्हाळ्यात दोन आवर्तन सोडली जाणार पहिला आवर्तन 3 मार्चपासून सुरू होणार आहे. दरम्यान, या बैठकीला पुणे, नगर आणि सोलापुर जिल्ह्यातील लोकप्रतिनीधी उपस्थित होते. तसेच खासदार सुप्रिया सुळे आणि आमदार रोहित पवार यांनीही या बैठकीला हजेरी लावली.

# 'मृत्युंजय'कारांच्या जन्मगावी स्मृतीदालनाचे लोकार्पण

प्रतिनिधी
आजरा

'मृत्युंजय'कार शिवाजीराव सावंत यांच्या स्मृतीप्रीत्यर्थ त्यांच्या जन्मगावी आजरा येथे कोल्हापूर जिल्हा परिषदेच्या वतीने उभारण्यात आलेल्या स्मृतीदालनाचे लोकार्पण नुकतेच महाराष्ट्राचे उच्च व तंत्र शिक्षण मंत्री ना. चंद्रकांतदादा पाटील यांच्या हस्ते करण्यात आले. अध्यक्षस्थानी कोल्हापूर जिल्ह्याचे पालक मंत्री हसन मुश्रीफ हे होते. निर्धार संस्था आणि पुण्यातील मृत्युंजय प्रतिष्ठानच्या सहयोगाने आयोजित करण्यात आलेल्या या लोकार्पण सोहळ्यात व्यासपीठावर राज्य कृषी व संशोधन परिषदेचे उपाध्यक्ष आमदार प्रकाश आबिटकर, आजरा-चंदगडचे आमदार राजेश पाटील, मृणालिनी शिवाजीराव सावंत, मृत्युंजय प्रतिष्ठानचे संस्थपाक डॉ. सागर देशपांडे, जि. प. चे माजी उपाध्यक्ष जयवंत शिंपी, निर्धारचे समीर देशपांडे आणि जि. प. चे प्रभारी सी. ई. ओ. अजयकुमार माने हे होते. ना. चंद्रकांतदादा पाटील यांनी कोल्हापूर जिल्ह्याचे पालकमंत्री असताना जिल्हा नियोजन मंडळाच्या माध्यमातून 50




**'मृत्युंजय'कार शिवाजीराव सावंत स्मृतिदालनाच्या लोकार्पण सोहळ्यात बोलताना ना. चंद्रकांतदादा पाटील, छायाचित्रात मृणालिनी सावंत, हसन मुश्रीफ, डॉ. सागर देशपांडे आदि.**

लाखांचा निधी या स्मृतीदालनासाठी दिला होता. कोरोना काळात हे काम अपूर्ण राहिल्यामुळे जिल्हा परिषदेने त्यानंतर हे काम पूर्ण करून घेतले.

'मृत्युंजय'कार शिवाजीराव सावंत हे काही काळ जिल्हा परिषदेच्या मेन राजाराम हायस्कूल, कोल्हापूर येथे लघुलेखनाचे शिक्षक म्हणून सेवेत होते. त्यामुळे या कामी जि. प. ने पुढाकार घेतला होता. स्मृतीदालनामध्ये सावंत यांचा जीवनप्रवास, त्यांची ग्रंथसंपदा, त्यांना मिळालेले सन्मान, दुर्मिळ छायाचित्रे अत्यंत विस्तृतपणे आणि आकर्षक स्वरुपात प्रदर्शित करण्यात आली आहेत. राष्ट्रीय-आंतरराष्ट्रीय पातळीवर कर्तृत्व गाजवलेले कलामहर्षी बाबुराव पेंटर, शिक्षणतज्ज्ञ डॉ. जे. पी. नाईक, संयुक्त महाराष्ट्र लढ्यातील शाहीर गव्हाणकर, ख्यातनाम संपादक बाबुराव ठाकुर, ग. वा. बेहरे, युरोपमधील पत्रकार द. वि. ताम्हणकर, वनस्पतीशास्त्रज्ञ डॉ. एल. एस. आजरेकर, संस्कृततज्ज्ञ डॉ. के. ना. वाटवे इत्यादी मूळच्या आजरेकरांचीही सचित्र माहिती या स्मृतिदालनात असून सुमारे 225 आसनक्षमतेचा हॉल बांधण्यात आला आहे.

समीर देशपांडे यांच्या प्रास्ताविकानंतर ना. चंद्रकांत पाटील आणि ना. हसन मुश्रीफ यांच्या हस्ते या स्मृतिदालनाच्या उभारणीसाठी सहयोग देणारे अधिकारी, कलाकार आणि समन्वयकांचा सत्कार करण्यात आला. यावेळी बोलताना चंद्रकांतदादा पाटील म्हणाले की, शिवाजीराव सावंत यांच्यासारख्या ख्यातनाम साहित्यिकाच्या नावे त्यांच्या जन्मगावी उभारण्यात आलेले हे स्मृतिदालन नवोदित लेखक, वाचक आणि नव्या पिढीतील सर्वांनाच प्रेरणा देणारे महत्त्वाचे केंद्र ठरणार आहे. एखाद्या शहरात आकर्षकपणे उभारण्यात येणाऱ्या स्मृतिदालनाप्रमाणेच या दालनाची मांडणी करण्यात आल्याबद्दल त्यांनी आनंद व्यक्त केला. या स्मृतिदालनासह भावी प्रकल्पांसाठी आवश्यक ते सहकार्य करण्याची ग्वाही यावेळी मंत्री हसन मुश्रीफ यांनी दिली. मृणालिनी सावंत यांनी या स्मृतिदालनाच्या उभारणीबद्दल कुटुंबियांच्या वतीने कृतज्ञता व्यक्त केली. आजरा, कोल्हापूर, पुणे येथे निर्धार आणि मृत्युंजय प्रतिष्ठानच्या वतीने गेली 22 वर्षे सावंत यांच्या स्मृतीप्रीत्यर्थ विविध उपक्रम राबवण्यात येत असल्याबद्दल आमदार आबिटकर आणि आमदार पाटील यांनी आपल्या भाषणात कौतुक केले. डॉ. सागर देशपांडे यांनी शिवाजीराव सावंत यांच्या आठवणींना उजाळा दिला. संदीप मगदूम यांनी सूत्रसंचलन केले. या कार्यक्रमास सावंत यांचे कोल्हापूर, पुणे येथील कुटुंबिय, स्नेही आणि साहित्यप्रेमी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## नवले पुलाजवळील अपघातात 8 ते 9 वाहनांची धडक

पुणे

ट्रकचालकाचे वाहनावरील नियंत्रण सुटल्याने नवले पुलावर एक विचित्र अपघात झाला आहे. ट्रकने पाठीमागून वाहनांना धडक दिल्याने हा विचित्र अपघात झाला आहे. या अपघातात आठ ते नऊ वाहने एकमेकांना धडकली असून काही प्रवासी किरकोळ जखमी झाले आहेत. मात्र, अपघातात वाहनांचे बरेच नुकसान झाले आहे. हा अपघात शनिवारी सकाळी घडला. कात्रजकडून (देहू रस्ता) नवले पुलाकडे जाणाऱ्या रस्त्यावर नवले पुलाच्या सिग्नलच्या अगोदर हा अपघात झाला. या महामार्गावर एका ट्रकचालकाचे वाहनावरील नियंत्रण सुटल्याने ट्रकने समोर उभ्या वाहनाला धडक दिली. या अपघातात आठ ते नऊ वाहने एकमेकांना धडकली. घटनेची माहिती मिळताच सिंहगड रस्ता वाहतूक विभागाचे अंमलदार आणि पोलिसांनी घटनास्थळी धाव घेऊन वाहने बाजूला केली. जखमींना जवळच्या खासगी रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. नवले पूल चौकातून राष्ट्रीय महामार्ग ६५ आणि ४८ वरील सर्व्हिस रस्ते जोडले जातात. कात्रज चौक ते नवले पुल हा रस्ता सहा पदरी असून तीव्र उताराचा आहे. नवले चौकात येणारी वाहने वेगात येतात.

# कशेडी घाटातील कोकणात येण्यासाठीचा मार्ग खुला



प्रतिनिधी
रत्नागिरी / खेड

शिमग्यासाठी कोकणात येणाऱ्यांना राष्ट्रीय महामार्ग विभागाने खुशखबर दिली आहे. कशेडी घाटातील बोगद्याचा एक मार्ग शनिवार २४ फेब्रुवारीपासून सुरू झाला असून, मुंबईहून कोकणात येणारी वाहने या बोगद्याचा वापर करू शकतात. सद्यस्थितीत मुंबईकडे जाण्यासाठी कशेडी घाटाचाच वापर करावा लागत असला तरी दुसऱ्या बोगद्यातील कामही अंतिम टप्प्यात आले असल्याने मार्चपर्यंत तो बोगदाही सुरू केला जाणार आहे.

मुंबई-गोवा राष्ट्रीय महामार्ग बांधकाम विभागाचे अभियंता पंकज गोसावी यांनी याबाबतची माहिती प्रसारमाध्यमांना दिली आहे. गणेशोत्सव काळात महामार्गावर वाढणारी गर्दी लक्षात घेऊन एका मार्गिकेचा वापर सुरू करण्यात आला होता. गणेशोत्सवाआधीचे काही दिवस कोकणात येणाऱ्या गाड्या या बोगद्यातून आल्या. गणेश विसर्जनानंतर हा बोगदा मुंबईकडे जाणाऱ्या गाड्यांसाठी खुला करण्यात आला. मात्र काही दिवसाच्या वापरानंतर तो बंद करण्यात आला. आतील फिनिशिंगची काही कामे झालेली नव्हती.

आता एका मार्गिकेचे (एका बोगद्याचे) सर्व काम पूर्ण झाले आहे. त्यामुळे मुंबईहून येणाऱ्या गाड्यांसाठी हा बोगदा खुला झाला आहे. शनिवारपासून त्याचा वापरही सुरू झाला आहे. पहिल्या टप्प्यात कार तसेच छोट्या गाड्यांना येथून जाण्याची मुभा आहे. मात्र मोठ्या गाड्याही लवकरच या बोगद्यातून सोडल्या जाणार आहेत.

## मराठा आंदोलकांनी गाडी अडवल्याने आजारी मुलाच्या आईने दाखवला रुद्रावतार

प्रतिनिधी
जालना

जालन्यातील अंतरवाली सराटी येथे मराठा आरक्षणासाठी सुरू असलेल्या मनोज जरांगे पाटलांच्या उपोषणाचा आज 15 वा दिवस आहे. आज राज्यभरातील गावागावात मराठा समाजाला ओबीसीतून आरक्षण मिळावे या मागणीसाठी 11 ते 1 या वेळेत रास्ता रोको आंदोलन करण्याचं आवाहन मनोज जरांगे पाटील यांनी केलंय.

या आंदोलनाचा विद्यार्थ्यांच्या



परीक्षेवर कोणताही परीणाम होणार नाही याची काळजी घेण्याचं आवाहन जरांगे यांनी आंदोलकांना केलंय. मात्र नांदेडमध्ये रुग्णालयात मुलाला घेऊन जाणाऱ्या महिलेची गाडी अडवल्याचा धक्कादायक प्रकार समोर आला आहे.

**12 वीच्या परीक्षेमुळे जरांगेंनी 'रास्ता रोको'चं स्वरुप बदललं**

रास्ता रोको

***जालना :*** *मराठा आरक्षणाच्या मागणीसाठी मनोज जरांगे पाटील यांच्या आवाहनानुसार आज राज्यभरामध्ये रास्तारोको आंदोलन केलं जाणार आहे. याच पार्श्वभूमीवर सकाळी प्रसारमाध्यमांशी संवाद साधताना बारावीच्या विद्यार्थ्यांच्या परीक्षा लक्षात घेत आंदोलनाच्या स्वरुपात बदल करण्यात आल्याची माहिती जरांगे-पाटलांनी दिली आहे. वेगवेगळ्या कारणांसाठी हे रास्तारोको आंदोलन केवळ सकाळी 11 ते दुपारी 1 वाजेपर्यंत केलं जाणार असल्याचं जरांगे-पाटलांनी म्हटलं आहे. दुपारी 1 नंतर या आंदोलनाचं रुपांतर धरणे आंदोलनात करावं, असं आवाहन जरांगेंनी मराठा बांधवांना केलं आहे. परिक्षेला जाणाऱ्या विद्यार्थ्यांना मदत लागली तर स्वत: तुम्ही त्यांना परीक्षाकेंद्रावर सोडून या असंही जरांगेंनी आंदोलकांना सांगितलं आहे.*

**मराठा आंदोलनाचा सिनेस्टाईल थरार; तरुणाने भररस्त्यात जाळली नवीकोरी बाईक**

***नांदेड :*** *राज्य सरकारने विशेष अधिवेशन बोलावून मराठा समाजाला १० टक्के स्वतंत्र आरक्षण देण्याचा निर्णय घेतला. मात्र, सरकारचा हा निर्णय फसवा असल्याचा आरोप मनोज जरांगे यांनी केला आहे. सरकारने सगेसोयरे अध्यादेशाचं कायद्यात रुपांतर करून मराठा समाजाला ओबीसीतून आरक्षण द्या, अशी मागणी देखील जरांगेंनी केली आहे. या मागणीसाठी आज (२४ फेब्रुवारी) राज्यातील गावागावात रास्ता रोको आंदोलन करण्यात येत आहे. काही ठिकाणी या आंदोलनाला हिंसक वळण देखील लागलंय. जालन्यात मराठा आंदोलकांनी मुंबई-नागपूर समृद्धी महामार्ग अडवण्याचा प्रयत्न केला. यावेळी पोलिसांमध्ये चांगलीच झटापट झाली. यावेळी पोलिसांनी २५ मराठा आंदोलकांना ताब्यात घेतलं. दुसरीकडे नांदेडमधील एका तरुणाने राज्य सरकारचा निषेध करत भररस्त्यात पेट्रोल टाकून आपली नवीकोरी दुचाकी जाळून टाकली. या थरारक घटनेचा व्हिडीओ सोशल मीडियावर व्हायरल झाला आहे.*

# आंबोली-चौकुळमध्ये ब्लॅक पँथरचे दर्शन

प्रतिनिधी
सावंतवाडी

चौकुळ येथे जंगलमय भागामध्ये काळा बिबट्या काही पर्यटकांना दिसून आला. त्या पर्यटकांपैकी काही पर्यटकांनी त्याचे छायाचित्रणही केले. त्यामुळे चौकुळ आणि आंबोलीची जैवविविधता पुन्हा एकदा अधोरेखित झाली आहे, परंतु या जैवविविधतेचे मोठे नुकसान होण्याची भीती ही व्यक्त होत आहे. त्यामुळे वनविभागाने शिकारी आणि तस्कर असलेल्या लोकांवर करडी नजर ठेवणे गरजेचे



असल्याचे मत निसर्गप्रेमींमधून मत व्यक्त होत आहे.

काळा बिबट्या म्हणजेच ब्लॅक पँथर म्हणून ज्याला ओळखले जाते. हा अतिशय दुर्मीळ बिबट असून, बिबट्यामधील जनुकीय बदलामुळे कधी-कधी काळा बिबट्या जन्माला येतो. हा बिबटा काळा असतो. आंबोलीमध्ये जवळपास २६ प्रकारचे वन्यप्राणी दिसून येतात. त्यामध्ये हत्ती, वाघ, बिबटे, अस्वल असे अनेक प्राणी आढळून येतात. त्यात भर म्हणून या काळा बिबट्यामुळे आंबोलीच्या जैवविविधतेमध्ये मानाचा तुरा रोवला गेला आहे. यापूर्वी केवळ आंबोलीमध्ये काळा बिबट्या आहे, असे म्हटले जायचे, परंतु आता त्याचे प्रत्यक्ष छायाचित्र मिळाल्याने आंबोली चौकुळची जैवविविधता पुन्हा एकदा अधोरेखित झाली आहे.

## राजेश टोपेंनी घेतली अजित पवारांची भेट?



प्रतिनिधी
पुणे

शरद पवार गटातील घनसांगवीचे आमदार राजेश टोपे यांनी आज (ता. २४ फेब्रुवारी) सकाळी उपमुख्यमंत्री अजित पवार यांची पुण्यात भेट घेतल्याची चर्चा रंगली आहे. टोपे हे पवारांची साथ सोडून अजितदादा गटात सामील होणार का, अशीही चर्चा आता रंगली आहे. त्यामुळे राज्याचे राजकारण पुन्हा एकदा तापले आहे.

अजित पवार यांनी भाजप-शिवसेना युतीसोबत जाऊन उपमुख्यमंत्री झाल्यानंतर आमदार राजेश टोपे यांनी शरद पवार यांच्यासोबत राहण्याचा निर्णय घेतला आहे. टोपे यांनी आतापर्यंत शरद पवार यांच्याच नेतृत्वात राजकीय वाटचाल केली आहे. राजेश टोपे यांचे वडील माजी खासदार अंकुशराव टोपे हे शरद पवारांचे अतिशय जवळचे स्नेही होते. त्यामुळे राजेश टोपे यांनीही शरद पवार यांच्यावर निष्ठा ठेवून आगामी काळात राजकीय प्रवास करण्याचे ठरविले आहे.

पुण्यातील शासकीय विश्रामगृहात अजित पवार आणि राजेश टोपे यांच्यामध्ये भेट झाल्याची चर्चा आहे. टोपे यांचे काही कार्यकर्त्यांसोबतचे फोटोही व्हायरल झाले आहेत, त्यामुळे राजेश टोपे हे अजितदादांच्या गोटात येणार असल्याची चर्चा रंगली आहे.

दरम्यान, आपण रायगडावरील राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी-शरदचंद्र पवार पक्षाला मिळालेल्या चिन्हाचे अनावरण करण्यासाठी आलो होतो. आमच्या मुक्कामची सोय पुण्यातील शासकीय विश्रामगृहात करण्यात आलेली होती, त्यामुळे माझा मुक्काम पुण्यातील गेस्ट हाऊसला होता. अजितदादा हे त्यांच्या कामाच्या सवयीप्रमाणे गेस्ट हाऊसला असतील. गर्दी होती. बैठका सुरू होत्या. मी माझ्या रूममधून गाडीत आलो. खाली काही लोक भेटले, त्यांच्यासोबत फोटो काढला आणि गाडीत बसलो, असे माजी आरोग्यमंत्री राजेश टोपे यांनी स्पष्ट केले.

ते म्हणाले, माझी आणि अजितदादांची आज भेटच झाली नाही. त्यामुळे मी त्यांच्यासोबत जाण्याचा प्रश्न येत नाही. आमच्या शरदचंद्र पवार गटाला मिळालेल्या तुतारीचे अनावरण रायगडावर शरद पवार यांच्या उपस्थितीत होत आहे. त्यामुळे आम्ही सर्वजण आता रायगडावर आहोत. पुण्यातून आम्ही हेलिकॉप्टरमधून रायगडला यायचं होतं, त्यामुळे आम्ही पुण्याला मुक्कामी आलो होतो.

## महाराष्ट्र एमएसएमई डिफेन्स एक्स्पोचे उपमुख्यमंत्र्यांच्या हस्ते उद्घाटन

# संरक्षण उद्योगांना चालना देण्यासाठी नवे धोरण तयार करण्यात येईल - उपमुख्यमंत्री

प्रतिनिधी
पुणे

देशातील सर्वात मोठ्या आणि महाराष्ट्रातील पहिल्या 'महाराष्ट्र एमएसएमई डिफेन्स एक्स्पो'चे उद्घाटन राज्याचे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते करण्यात आले. महाराष्ट्रात संरक्षण उद्योगाला चालना देण्यासाठी नवे धोरण तयार करण्यात येईल आणि या क्षेत्रातील सूक्ष्म, लघू आणि मध्यम उद्योगांच्या विकासासाठी प्रयत्न करण्यात येईल, असे प्रतिपादन उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केले.

मोशी येथील इंटरनॅशनल एक्झिबिशन ॲण्ड कन्व्हेन्शन सेंटर येथे आयोजित या कार्यक्रमाला राज्याचे उच्च व तंत्रशिक्षण मंत्री चंद्रकांतदादा



